


नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १ * अंक ९१ * * नाशिक * रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)



मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६


## मनोज जरांगे आणि शिष्टमंडळ यांच्यातील

# चर्चा फिस्कटली !

**जरांगेंच्या आंदोलनाचा दुसरा दिवस**

**सरकारला अल्टीमेटम**

**संपूर्ण मुंबईची कोंडी**

**आंदोलकांचे बेहाल**

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. आज त्यांच्या आंदोलनाचा दुसरा दिवस होता. या प्रकरणी तोडगा काढण्यासाठी सरकारवरील दबाव वाढला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी यासंबंधी सखोल आढावा घेतल्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर लवकरच ठोस तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जरांगे यांच्या आंदोलनाच्या विरोधात ओबीसी समाजाला रस्त्यावर उतरवण्याचा इशारा दिल्यामुळे हा तिढा अधिकच बिकट होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, सरकारच्यावतिने पाठविण्यात आलेल्या शिंदे समितीसोबत जरांगे यांची झालेली चर्चा फिस्कटली असून, सरकारला आता वेळ देणार नसल्याचे जरांगे यांनी ठासून सांगितले आहे . शिंदे समितीने बॉम्बे गव्हर्नमेंट व औंध संस्थानच्या गॅझेटियरसाठी वेळ मागितला. या दोन मुद्यांवर वेळ देण्यासाठी आमची तयारी आहे. पण पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या मुद्यावर एक मिनिटही वेळ मिळणार नाही, असे जरांगे म्हणाले.

शिंदे समितीला इकडे चर्चेसाठी पाठवणे हा मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या राज्य सरकारचा, राज्याच्या राजभवनाचा व दोन्ही कायदेमंडळाचा केलेला अपमान आहे. हे काम शिंदे समितीचे नाही. मुख्यमंत्र्यांकडून राज्यपाल भवनाचा अपमान होत आहे. सरकारने राज्य मंत्रिमंडळाला चर्चा



करण्यासाठी पाठवण्याची गरज होती. पण त्यांनी शिंदे समितीला पाठवले. हे साफ चूक आहे. इथे विधान मंडळ अस्तित्वात आहे. इथे राज्यपाल अस्तित्वात आहेत. त्यानंतरही त्यांनी शिंदे समितीला पाठवून राज्याचा अपमान केला. स्वतः देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राच्या कायदेमंडळाचा अपमान करण्याचे काम करत आहेत. कदाचित त्यांचे तोंड काळे झाले असेल म्हणून त्यांनी ही समिती पाठवली असेल, असे जरांगे म्हणाले.

**एक तासाचाही वेळ वाढवून मिळणार नाही**

शिंदे समिती आमच्याकडे वेळ मागत होती. पण आम्ही त्यांना एक तासाचाही वेळ दिला नाही. सगेसोयरेच्या मुद्यावर आमची त्यांच्याशी चर्चाच झाली नाही. मराठा व कुणबी एकच आहे. हा ५८ लाख नोंदींचा अहवाल आहे.

**मी मराठा कुणबी घोषित केल्याशिवाय येथून उठणार नाही**

मनोज जरांगे यांनी सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना आपण मराठा - कुणबी घोषित केल्याशिवाय जागा सोडणार नसल्याचे ठणकावून सांगितले. सरकारने हैदराबाद व सातारा गॅझेटनुसार नोंदी घ्याव्यात.



### मराठा आंदोलकांचा गोंधळ

दक्षिण मुंबईत सध्या खाऊ गल्ली बंद असल्यामुळे मंत्रालयाजवळ असलेल्या आकाशवाणी आमदार निवासच्या कँटीनमध्ये आंदोलकांनी जेवण्यासाठी गर्दी केली आहे. अचानक वाढलेल्या या गदीर्मुळे काही काळासाठी आकाशवाणी आमदार निवासाची कँटीन बंद करण्यात आली. यामुळे आंदोलकानी मोठा गोंधळ केला. आंदोलकांच्या गोंधळानंतर टप्प्याटप्प्याने कँटीनमध्ये जेवायला सुरुवात केली आहे.

### मराठे वेदना घेऊन आलेत

आंदोलकांबाबत गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न सुरु आहे. मराठ्यांची मुलं काही म्हणणार नाहीत, ते माज घेऊन नव्हे तर वेदना घेऊन मुंबईत आले आहेत. मी मराठ्यांसाठी बलिदान देण्यासाठी तयार आहे. आता मी मरेल किंवा आरक्षण मिळवेल. मी एकतर उपोषण करुन मरेल किंवा सरकार मला गोळ्या घालून मारेल, पण मी आता मागे हटणार नाही, अशा शब्दात जरांगेंनी ठणकावून सांगितले.

### आरक्षणासाठी घटनादुरुस्ती गरजेची : शरद पवार

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. जर तामिळनाडूमध्ये ७२ टक्के आरक्षण देता येऊ शकते, तर घटनेत बदल करून महाराष्ट्रातील मराठा समाजालाही न्याय देता येऊ शकतो. आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल, तर घटनादुरुस्ती आवश्यक आहे, असे विधान त्यांनी अहमदनगर येथील कार्यक्रमात केले. शरद पवार यांनी स्पष्ट केले की, समाजाच्या प्रगतीसाठी आरक्षण हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. केंद्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन वेळप्रसंगी संसदेत घटनादुरुस्ती करणे आवश्यक आहे,असेही ते म्हणाले. सुप्रीम कोर्टाने ५०- ५२% आरक्षण मर्यादा



घालून दिली असली तरी तामिळनाडूसारख्या राज्यात ७२% आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकले असल्याचे उदाहरण देत पवार यांनी मराठा आरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले.

मराठवाड्यातील मराठा समाजाला सरसकट कुणबी घोषित करावे. उद्या सकाळपासूनच सर्वांना कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यास सुरुवात करा. मराठवाड्यातील सगळा मराठा समाज हा कुणबी आहे यावर आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही, असे जरांगे म्हणाले. त्यावर शिष्टमंडळाने असे करता येणार नाही असे म्हणाले. त्यानंतर जरांगे यांनी आपण मराठा कुणबी घोषित केल्याशिवाय आझाद मैदान सोडणार नाही, एक दिवसांची परवानगी देण्याचे हे असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा सरकारने मराठ्यांना आरक्षण देऊन टाकावे, सर्व समस्या सुटतील, त्यांनी असे स्पष्ट सांगितले.

## कंटेनरने चिरडले

## ६ भाविक ठार

**मंदिरात दर्शनाला जाताना काळाचा घाला**

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ३० :

भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत ६ भाविकांचा जागीच मृत्यू झाल्याची भयंकर घटना शनिवारी सकाळी बीड शहरालगतच्या सोलापूर - धुळे महामार्गावरील नामलगाव फाटा येथे घडली आहे. हे सर्व भाविक पेंडगाव येथील हनुमान मंदिरात दर्शनासाठी पायी जात होते. तेव्हाच काळाने झडप घातली.

माहितीनुसार, बीड शहर व तालुक्यातील शिदोड गावचे काही भाविक शनिवारी सकाळी ७.३० च्या सुमारास पेंडगाव येथील हनुमान मंदिरात दर्शनासाठी पायी जात होते. तेव्हा भरधाव वेगातील एका कंटेनरने त्यांना चिरडले. हा अपघात एवढा भयंकर होता की, ४ भाविकांचा जागीच मृत्यू झाला. तर इतर दोघांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस व गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना रुग्णालयात हलवले. या घटनेत इतर काही भाविक जखमी झाल्याची माहिती आहे. त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विशाल श्रीकिसन काकडे (रा. शेकटे, ता. शेवगाव, जि. अहमदनगर), अमोल नामदेव गरजे (रा. बोधेगाव, ता. शेवगाव), आकाश कोळसे, पवन जगताप, किशोर तोर (रा. बाबुलतरा, ता. गेवराई) अशी या अपघातात ठार झालेल्या मृतांची नावे आहेत. इतर दोघांची नावे समजू शकली नाहीत.

पोलिसांनी कंटेनर चालकाला अटक केली आहे. या घनटेमुळे परिसरात एकच खळबळ माजली असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे काही दिवसांपूर्वी गढी उड्डाणपुलाजवळही असाच एक अपघात झाला होता. त्यात कंटेनरच्या धडकेतच ५-६ जणांचा मृत्यू झाला होता.

## भारत कोणत्याही किंमतीत तडजोड करणार नाही

**टॅरिफ वादावर राजनाथ यांचे रोखठोक उत्तर**

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :



अमेरिकेच्या शुल्कावरील वादाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, कोणताही देश कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो. फक्त कायमचे हित असते. शनिवारी एनडीटीव्ही संरक्षण शिखर परिषदेत राजनाथ सिंह यांनी हे विधान केले.

ते म्हणाले की जगात व्यापार युद्धासारखी परिस्थिती आहे. विकसित देश अधिकाधिक संरक्षणवादी होत आहेत. भारत कोणालाही आपला शत्रू मानत नाही, परंतु आम्ही राष्ट्रीय हित आणि लोकांच्या हिताशी तडजोड करणार नाही. ट्रम्पच्या टॅरिफ विरोधात भारत, रशिया आणि चीन जवळ येत असल्याने राजनाथ यांचे विधान जोडले जात आहे.

सिंह म्हणाले, भारताच्या संरक्षण क्षमतेचे जग साक्षीदार आहे. आपल्या सैन्याने ज्या पद्धतीने स्वदेशी उपकरणांनी पाकिस्तानवर अचूक हल्ले केले त्यावरून हे दिसून येते की दूरदृष्टी आणि तयारीशिवाय कोणतेही अभियान यशस्वी होऊ शकत नाही. २०१४ मध्ये, आपली संरक्षण निर्यात ७०० कोटी रुपयांपेक्षा कमी होती. आज ती सुमारे २४ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे, जी विक्रमी पातळी गाठली आहे. यावरून असे दिसून येते की भारत आता खरेदीदार राहिला नाही तर निर्यातदार बनत आहे.

दुसरीकडे,हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी यांनी ऑपरेशन सिंदूरचे नवीन व्हिडिओ आणि तपशील शेअर केले. ते म्हणाले की, पाकिस्तानला युद्धबंदीच्या टेबलावर आणण्यासाठी भारतीय हवाई दलाने ५० पेक्षा कमी शस्त्रे गोळीबार केला.

## अमित शहांनी घेतला आंदोलनाचा आढावा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे अवघ्या राज्याचे रान पेटले आहे. त्यातच मुंबईच्या दौऱ्यावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी भाजप सरचिटणीस विनोद तावडे यांच्याकडून या आंदोलनाचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी त्यांनी हे आंदोलन हाताळण्यासंदर्भात काही सूचना केल्याचीही माहिती आहे. शहांनी सह्याद्री अतिथीगृहावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही या प्रकरणी चर्चा केली. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आता सरकारच्या पातळीवर वेगवान



हालचाली होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अमित शहा शुक्रवारी रात्री मुंबईला पोहोचले. त्यांनी आज लालबागच्या राजाचे सहकुटुंब दर्शन घेतले. तत्पूर्वी, त्यांनी आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत धडकलेल्या मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा आढावा घेतला. यासाठी त्यांनी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना त्यांनी सह्याद्री अतिथीगृहावर पाचारण केले. यावेळी दोन्ही नेत्यांत बराच वेळ चर्चा झाली. त्यानंतर या ठिकाणी सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे हे ही पोहोचले. शहा यांनी यावेळी शिंदे यांच्याशी जवळपास तासभर चर्चा केल्याची माहिती आहे.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते. या बैठकीत नेमके काय ठरले हे समोर आले नाही. बैठकीनंतर अमित शहा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या सरकारी बंगल्यावर जाऊन त्यांच्या गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नीही होत्या.

## दोन समाज झुंजवणे योग्य नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

दोन समाजात तेढ निर्माण करणे आमच्या तत्त्वात बसत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. एका समाजाला संतुष्ट करण्यासाठी दुसऱ्या समाजाला असंतुष्ट करणे सरकारला मान्य नसल्याचेही ते म्हणालेत.



सगळ्याचे समाधान काढण्यावर आमचा प्रयत्न आहे, राज्यात युती आणि महायुतीच्या सरकारनेच मराठा समाजासाठी चांगले निर्णय घेतल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत. आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने मराठा बांधव जमले आहेत. दुसरीकडे, सरकारने या प्रश्नावर चर्चेसाठी पुढाकार घेतला आहे.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनासंदर्भात सरकारची भूमिका पहिल्या दिवशीपासून स्पष्ट असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. कोणत्या राज्याला वाटत असेल की, आपल्या राज्यातील मोठा घटक असंतुष्ट राहावा, त्याच काय फायदा आहे. पण, एकाच्या संतुष्टीकरता दुसऱ्याला त्याच्यासमोर भांडणासाठी उभे करा, दुसऱ्याला असंतुष्ट करा हे आम्हाला मान्य नाही. राजकारण चुलीत गेले पण अशाप्रकारे समजा-समाजामध्ये तेढ निर्माण करणे हे आमच्या तत्त्वात कुठेही बसत नाही. म्हणून, सगळ्याचे समाधान कसे निघेल असा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## वंशावळ समितीस मुदतवाढ

**मराठा समाजासाठी दिलासा : शिरसाट यांची माहिती**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील अवघी मुंबई वेठीस धरली असताना राज्य सरकारने मराठा समाजाला मोठा दिलासा देत मराठा आरक्षणासंबंधी तालुकास्तरीय वंशावळ समितीस 30 जून 2030 पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयाचा मराठा समाजातील लाखो नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी शुक्रवारपासून मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. सरकारने शक्य त्या मार्गाने मराठा समाजाला दिलासा देण्याचे काम सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने वंशावळ समितीस मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

माहितीनुसार, राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीस शासनाने दि. 30 जून 2026 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केला असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या 25 जानेवारी 2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये ही समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या कार्यकाळाला यापूर्वी 30 जून 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर, मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीचा कार्यकाळ 31 डिसेंबर 2025 पर्यंत वाढविण्यात आला होता.

यास अनुसरून तालुकास्तरीय वंशावळ समितीस उच्चस्तरीय समितीच्या मुदतवाढीपेक्षा किमान सहा महिने अधिक मुदत देण्याचा विचार शासनाकडून करण्यात आला होता. त्यानुसार, आता या समितीचा कार्यकाळ 30 जून 2026 पर्यंत वाढविण्यात आला आहे. सदर समितीस 25 जानेवारी 2024 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील.

## रियासीमध्ये भूस्खलन ७ मृतदेह काढले

■ वृत्तसंस्था,जम्मू, दि. ३० :

शनिवारी सकाळी जम्मू-काश्मीरमधील रियासी जिल्ह्यातील बदर गावात भूस्खलन झाले. आतापर्यंत ढिगाऱ्यातून ७ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. इतर लोकांचा शोध सुरू आहे. त्याच वेळी, रामबनच्या राजगडमध्ये ढगफुटीमुळे ३ जणांचा मृत्यू झाला. २ जण बेपत्ता आहेत. येथे बचाव-शोध मोहीम राबविण्यात येत आहे.

शुक्रवारी रात्री उशिरा हिमाचल प्रदेशातील मंडी येथील गोहर येथे ढगफुटी झाली. नंदी पंचायतीतील नसेनी नाल्यात अनेक वाहने वाहून गेली. शिमला येथील जुतोग कॅन्टमध्ये भूस्खलन झाले. लष्कराच्या निवासी इमारती रिकामी करण्यात आल्या.

अमृतसर, पठाणकोटसह पंजाबमधील ८ जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. २५० हून अधिक गावे ५ ते १५ फूट पाण्याने भरली आहेत. आतापर्यंत ८ जणांचा पुरात मृत्यू झाला आहे. ३ जण बेपत्ता आहेत.

शुक्रवारी उत्तराखंडमधील चमोली, रुद्रप्रयाग, टिहरी आणि बागेश्वर येथे ढगफुटी झाली. या दुर्घटनेत ५ जणांचा मृत्यू झाला.




मराठा समाजाचा आरक्षणासाठीचा संघर्ष पुन्हा एकदा मुंबईच्या आझाद मैदानावर जनआंदोलनाच्या रुपाने उभा राहीलेला दिसला. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले हे आंदोलन केवळ काही मागण्यांचा उच्चार नाही, तर समाजाच्या अस्तित्वाची व सन्मानाची हाक आहे, याची जाणीव समाजाला झाली. जरांगे पाटलांनी या आंदोलनाला शांतता, संयम आणि सामाजिक सलोख्याचा आधार दिला. महिलांचा सन्मान राखणे, शासकीय संपत्तीचे रक्षण करणे, कायदा हातात न घेणे या त्यांच्या सूचनांमुळे हे आंदोलन लोकशाहीतील आदर्श ठरले. त्यांनी जागा केलेल्या मराठा समाजामुळे पक्षाच्या चाकरीत झोपलेले स्वार्थी नेते आता कदाचित जागे होतील. जरांगे पाटील यांनी सामाजाच्या गोरगरीब मुलांच्या भविष्याच्या काळजीने जागा केलेला मराठा समाज बांधवही जागा झाला. गावागावातून निघाल्यापासून ते मुंबईपर्यंत अफाट असा जनसागर त्यांच्यासोबत गेला. मुंबईकरांनी पाहिली नसेल इतकी रेकॉर्डब्रेक गर्दी त्यांना पहायला मिळतेय आणि इथून पुढेही पहायला मिळेल असे वाटते. जरांगे, त्यांची भाषा, वागणं, बोलणं अगदी सर्वसामान्य माणसांसारखं आहे. असा माणूस लगेच सर्वसामान्यांना अपील होतो. माणसं साधीच असतात. फक्त मोठ्या पंचतारांकित लोकांनी त्यांना गृहीत धरू नये. हेटाळणी वा अवहेलना तर कधीही करू नये. ती फार जिद्दी असतात आणि महात्मा गांधीच म्हणाले होते की, 'सर्वसामान्य माणसाच्या शहानपणावर माझा विश्वास आहे.' मुंबईत यावर्षी गणपतीत मराठा फेस्टिवल साजरा झाला. तो शांततेत छानपैकी साजरा होईल, असे दिसते. आजही गावगाड्यात अठरा पगड जाती गुण्यागोविंदाने राहतात, पण ही टाळूवरील लोणी खाणारी प्रत्येक समाजातील काही स्वयंघोषित नेते यात अडथळा आणताय. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाने मराठा समाज एकच झालाचं, त्याचबरोबर इतर समाजही एक झाल्याचं आशादायी चित्र महाराष्ट्रात दिसतयं. आंदोलनस्थळी आंदोलकांना सुविधा उपलब्ध करून द्यायच्या असतात आणि हेच लोकशाहीचे खरे तत्व आहे, परंतु राज्य सरकार आंदोलकांची गैरसोय कशी होईल याचे नियोजन करत असेल तर ते हुकुमशाहीचे लक्षण म्हणावे लागेल. प्रसाद लाड, चित्रा वाघ, प्रवीण दरेकर, नितेश राणे, गुणरत्न सदावर्ते, लक्ष्मण हाके अशा वाचाळवीर लोकांना पुढे करून जरांगे पाटलांना डिवचण्याऐवजी त्यांच्या मागण्यांना सरकारकडून वेळीच प्रतिसाद दिला गेला असता तर आज आंदोलनाची ही वेळ आली नसती. ते काहीही असले व जरांगे पाटील यांना ठराविक नेते टार्गेट करीत असले तरी हा फाटका माणूस या राज्यात इतिहास घडवेल हे मात्र लवकरच सिद्ध होईल!

# एक 'फाटका' माणूस 'इतिहास' घडवेल?



हजारो लाखोच्या संख्येने मोर्चे काढून पण भाजप व त्याच्या मित्रपक्षांना मराठा समाजाची भीतीचं राहिली नाही. त्याच कारण अस की, लाखोच्या गर्दीच रूपांतर मतदानात झालं नाही. त्यामुळे सरकार बिनधास्त झालंय. लाखोच्या संख्येने मोर्चे निघून पण निवडणुकीत काहीच परिणाम होत नाही याचा अंदाज आल्यामुळे भाजप मराठ्यांना न जुमानता ओबीसी समाजाला ताकद देत आहे. लोकांनी पण विधानसभा निवडणूकीत उमेदवारांची जातं पाहून तर काही ठिकाणी व्यक्तिगत लाभ, संबंध बघून भाजप, सेना, अजित पवारांचे आमदार निवडून आणलेत. जोपर्यंत गर्दीचं रूपांतर सरकारच्या विरोधात मतदानरुपी होणार नाही, तोपर्यंत या संघर्षाला महत्व येणार नाही. मराठे भाजप विरोधात बोलतात, मात्र मतदान त्यांनाच करतात. मतदानाचं लॉजिक काय तर उमेदवार मराठा आहे. मराठा समाज भाजप विरोधात जाण्याने ओबीसी समाज भाजपकडे गेला. भाजपला दोन्ही बाजूने फायदाच होतोय, ओबीसींचेही मतदान मिळतंय आणि मराठा समाजाचं पण मतदान मिळतंय. एक सर्वे सांगतोय की महायुतीला ४० टक्के मतदान ओबीसी समाजानं केलंय तर ३६ टक्के मतदान मराठा समाजानं केलेलं आहे. सोशल मीडियावर भाजपला शिव्या द्यायच्या नी तिकडं त्यांनाच मतदान करून घरी यायचं, असंच सर्वत्र दिसलं. उदाहरणच द्यायचं ठरलं तर राज ठाकरेंच्या सभेला गर्दी होते, पण गर्दीचं रूपांतर मतदानात होत नाही. मराठा समाजाची अवस्था पण राज ठाकरेंच्या सभेसारखीच झाली आहे. गाव खेड्यात मराठा समाज मोठा भाऊ म्हणून प्रत्येक समाजबांधवाला सोबत घेऊन विकासाच्या दृष्टीने काम करतो, गुण्यागोविंदाने राहण्यासाठी कायम प्रयत्नशील राहतो. या आंदोलनामुळे सरकारच्या काही गोष्टी खूपच खटकल्या. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर खाऊगल्ल्या बंद ठेवण्याचे अलिखित फतवे गृहविभागाने काढल्याचे समोर येत आहे. खाऊगल्ल्यांना बंद ठेवण्यामागे गृहविभागाचा हेतू काय? मोठ्या प्रमाणात गर्दी होणार असेल तर उलट खाऊगल्ल्या सुरु ठेवायला हव्यात. गृहविभागाने आपले अलिखित फतवे मागे घेण्याची गरज होती. तसेच आंदोलकांची मोठ्या प्रमाणात असलेली संख्या बघता आझाद मैदानावर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे यासारख्या कोणत्याच मुलभूत सुविधा सरकारने उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत, त्यामागचे लॉजिक सहज लक्षात आले. या ना त्या मार्गाने दगाफटका करण्याचा डाव सरकार आखत असेल तर सरकार मोठी चूक करत आहे, हे सरकारने विसरू नये. महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय परंपरेत मराठा समाजाचे योगदान अतुलनीय आहे. शौर्य, पराक्रम, शेतमजुरी, नेतृत्व आणि समाजकारण यातून हा समाज घडला. पण गेल्या अनेक दशकांपासून मराठा समाजाला आरक्षणाचा प्रश्न चिघळत ठेवण्यात आला आहे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

हा प्रश्न फक्त आरक्षणा पुरता मर्यादित नाही, तर मराठा व कुणबी हे एकच आहेत का, या मूळ स्वरूपाच्या प्रश्नावर तो आधारलेला आहे. आज जरांगे पाटीलांसारखे लढवय्ये कार्यकर्ते ठामपणे सांगत आहेत मराठा, कुणबी, पाटील, देशमुख हे स्वतंत्र नाहीत; हे सर्व एकाच समाजाचे भाग आहेत. याचे पुरावे इतके ठोस आहेत की, कोणत्याही शासनाने किंवा न्यायालयाने त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे न्याय, समाज आणि इतिहास या तिन्हींचा अपमान आहे. मराठा आणि कुणबी समाजात विवाह, बेटीव्यवहार, रोटीव्यवहार शतकानुशतके होत आले आहेत. कुणबी शेतकरी, पाटील गावप्रमुख, देशमुख परगण्याचे नेते आणि मराठा योद्धा अशी विभागणी ही कार्यपद्धतीवर आधारित होती, जातिभेदावर नव्हे. त्यामुळे कुणबी आणि मराठा या नावांमध्ये भिन्नता असली तरी त्यांच्या जीवनपद्धती, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक आचार एकच राहिले आहेत. 'मराठा म्हणजे कुणबी, आणि कुणबी म्हणजे मराठा' ही धारणा फक्त लोक कथांमध्ये नाही, तर सामाजिक घटनांमध्ये प्रत्यक्ष दिसून येते. ग्रामीण भागातील असंख्य कुटुंबे मराठा–कुणबी नात्यांनी एकमेकांशी जोडलेली आहेत. कुणबी घरातील मुलगी मराठा घरात जाते, मराठा घरातील मुलगी कुणबी घरात जाते आणि त्यात कुठेही अडचण येत नाही. जर हे दोन वेगळे समाज असते, तर असा स्नेहसंबंध कसा शक्य झाला असता? फडणवीस व सरकार मुद्दाम मराठा समाज आरक्षण आंदोलन विरोधी पक्षासी जोडून आपल्या कर्तव्यापासून दूर जात आहे. त्यांनी कितीही हे आंदोलन याच्या-त्याच्याशी जोडून गुंडाळण्याचा प्रयत्न केला तरी ते सरकारला जड जाईल. जरांगे पाटील यांच्या आंदोलनाशी सर्वपक्षीय मराठा जोडला गेला आहे. त्यामूळे विनाकारण ताणून धरायला नको आहे. जरांगे पाटीलांशी चर्चा करून ओबीसी व मराठा समाजाच्या नेत्यांशी समन्वय साधून यातून मार्ग कसा काढता येईल याचा प्रयत्न तेकरू शकतात. महाराष्ट्रातील सर्वच मराठा व ओबीसी समाजाची भावना हीच झाली आहे. काहीतरी करून मार्ग काढून हा विषय मिटविला पाहिजे. पण सरकार तसे करताना दिसत नाहीत. त्यांनी ठरवले तर कोणताही मार्ग निघू शकतो. विरोधी पक्ष यात काहीच करू शकत नाही. कारण महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांना आता शांतता हवीय, जातीवाद नकोय आता.

## न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय दिलाच होता

खरं म्हणजे १९२१ साली मुंबई हायकोर्टाने दिलेला निर्णय हा या वादावर शिक्कामोर्तब करणारा आहे. त्या निर्णयात स्पष्ट नमूद केले आहे की, मराठा (क्षत्रिय) आणि कुळंबी/कुणबी हे एकच आहेत. न्यायालयासमोर ठेवलेले पुरावे, परंपरा आणि सामाजिक नोंदी यांच्या आधारे हा निष्कर्ष नोंदवला गेला. म्हणजे शंभरहून अधिक वर्षांपूर्वी न्यायालयाने हा वाद संपवून टाकला होता. तरीदेखील आज शासन हीच गोष्ट मान्य करण्यास तयार नाही. हे प्रशासनाच्या दुटप्पी वृत्तीचे द्योतक आहे. जर शासनाने खरोखरच समाज हिताचा विचार केला असता, तर एका साध्या शासन निर्णयाने (जीआर) ने हा प्रश्न कायमचा सुटू शकला असता. याआधी ओबीसी प्रवर्गात अनेक जातींना समाविष्ट करण्यात आले आहे. त्यासाठी जीआर काढून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मग मराठा समाजाला त्याच पद्धतीने न्याय का दिला जात नाही? खरे तर, प्रश्न इतकाच आहे की शासनाला समाजाला न्याय द्यायचा आहे का नाही? कारण प्रक्रिया कठीण नाही, पण राजकीय धाडस लागते.

## 'फोडा आणि राज्य करा'चा खेळ

आज राज्यात शासन-प्रशासनाकडून "फोडा आणि राज्य करा" हीच नीती वापरली जात आहे. एकीकडे ओबीसींना प्रोत्साहन, दुसरीकडे मराठ्यांना दडपण आणि तिसरीकडे या दोन समाजांत संघर्ष उभा करणे हा खेळ सुरू आहे. "एक भाऊ मराठा, एक भाऊ कुणबी, एक भाऊ देशमुख" हे सर्व स्वतंत्र नाहीत, पण त्यांना वेगळे मानून राजकीय पोळी भाजली जात आहे. आज जरांगे पाटीलांसारखे सामाजिक कार्यकर्ते मुंबईत आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांचा मुद्दा एकच आहे शासनाने त्वरित निर्णय घेऊन मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र द्यावे. कारण शासन जितका वेळ खेचत आहे, तितका समाजातील असंतोष वाढत आहे. महाराष्ट्रात कुठेही आंदोलन भडकू शकते. शासनाला जर खरंच राज्यातील शांतता जपायची असेल, तर हा प्रश्न लगेच सोडवायला हवा. नाहीतर परिस्थिती बिघडण्याची पूर्ण शक्यता आहे. या प्रश्नाला सोडवण्यासाठी फार मोठा कायदेशीर गोंधळ नाही. शासनाने एक शासननिर्णय काढून मराठा, कुणबी, पाटील, देशमुख हे एकच असल्याचे स्पष्ट करावे आणि त्या सर्वांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे आदेश द्यावेत. केंद्र सरकारकडे सुद्धा या संदर्भात कायदेकरीता मार्ग उपलब्ध आहे. इच्छाशक्ती असेल, तर हा प्रश्न एका दिवसात निकाली निघू शकतो. पण इच्छाशक्तीच नसल्याने हा प्रश्न वर्षानुवर्षे लांबणीवर टाकला जात आहे.

## आंदोलनाला पाठिंब्यासाठी काही संघटना गायब कशा?

हजारो मराठा बांधव "एक मराठा लाख मराठा" अशा घोषणांनी एकवटले दिसले. विशेषतः गरीब कुटुंबांसाठी शिक्षण आणि नोकरीच्या संधी मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शासनाने केवळ तात्पुरते आश्वासन न देता कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, जेणेकरून पुढे पुन्हा आंदोलन करण्याची वेळ समाजावर येणार नाही. मराठा समाजाच्या न्याय्य मागण्या पूर्ण व्हाव्यात, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीसाठीचा हक्क मिळावा आणि समाजाचा आत्मसन्मान अबाधित रहावा, हेच ध्येय ठेवून लाखो मराठे रस्त्यावर आले. कारण हा संघर्ष स्वाभिमानाचा असल्याने तो यशस्वी व्हावा ही प्रत्येकाची अपेक्षा आहे. हिंदु राष्ट्रातील लाखो हिंदू मराठ्यांच्या मुंबईतील आंदोलनाला मदतीसाठी व पाठींब्यासाठी अनेक संघटना मैदानात आल्या. पण विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, श्रीराम सेना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू जनजागरण समिती, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तसेच महाराष्ट्रात व्यवसाय करून लाखो कोटींचा फायदा कमावणाऱ्या किर्लोस्कर, फिनोलेक्स, अदाणी, अंबानी, बिर्ला, टाटा यांच्या सीआरएस फंडाच्या समित्या मदत करत दिसल्याचे कुठेही दिसले नाही. याला कृतघ्नपणा म्हणायचे नाही का?

## एकनाथ शिंदेंनी बाळगले मौन

गणेशोत्सव आणि मनोज जरांगे यांच्या मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मंत्र्यांची एक गुप्त बैठक झाल्याची माहिती समोर आली. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाविषयी शिवसेनेच्या मंत्र्यांनी माध्यमांसमोर कोणतंही वक्तव्य करु नये अशी सक्त ताकीद एकनाथ शिंदे यांनी या बैठकीत दिली होती. मराठा आरक्षणाचे वादळ घोंगावत असताना, जरांगे यांना मुंबईत येण्यापासून रोखण्यासाठी भाजप नेते प्रयत्नशील आहेत. संधी मिळेल त्यावेळी भाजपकडून मनोज जरांगे यांच्यावर टीका केली जात आहे. त्याचवेळी एकनाथ शिंदे वा शिवसेनेच्या मंत्र्यांनी या मुद्यावर मात्र मौन बाळगल्याचे दिसून येत आहे. जरांगेंचे टार्गेट फडणवीस दिसले, अशावेळी शिंदे मात्र गप्प बसले. एकनाथ शिंदे मराठ्यांना आरक्षण द्यायला तयार होते, पण फडणवीसांनी आडकाठी आणली, असा आरोप जरांगेंनी केला आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी गेल्या आठ महिन्यात मराठा समाजाच्या मागण्यांचा विचारच केला नाही. यावरून त्यावेळीही फडणवीसांनीच काम रोखल्याचा आरोप जरांगेंनी केला होता. जरांगे हे मुख्यमंत्री फडणवीसांवर सातत्याने हल्लाबोल करत असताना एकनाथ शिंदेंनी मात्र यावरमौन का बाळगले?

## ➤ महत्त्वाचे

### ॲड. मिलिंद चिंधडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**नाशिक ।** येथील ॲड. प्रा. मिलिंद चिंधडे यांच्या 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गोतावळा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा १४ सप्टेंबरला रविवारी मु. शं. औरंगाबादकर सभागृह सभागृहात सायंकाळी सहा वाजता होणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्रीराम महाजन, प्रा.हेरंब गोविलकर, प्रा. डॉ.दिलीप बेलगावकर तर अध्यक्षस्थानी प्रकाश पाठक असतील. वैशाली प्रकाशन प्रकाशित या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष संपत आलेले असताना पुस्तक प्रकाशन होत आहे, ही गोष्ट अत्यंत औचित्यपूर्ण आहे.

### भांडारपाल अनिल गांगुर्डे सेवानिवृत्त



**नाशिक ।** सार्वजनिक बांधकाम विभागातील भांडारपाल अनिल नारायण गांगुर्डे हे ३० वर्षाच्या दीर्घ सेवेनंतर शुक्रवारी सेवानिवृत्त झाले. शासकीय नोकरीला लागण्यापूर्वी गांगुर्डे यांनी काही काळ पत्रकारिताही केली. त्यानंतर ते सार्वजनिक बांधकाम विभागात सहाय्यक भांडारपाल म्हणून रुजू झाले. त्यांनी या पदावर जळगाव, नंदुरबार, संगमनेर, मालेगाव आणि नाशिक आदी ठिकाणी सेवा बजावली. नाशिक येथे भांडारपाल म्हणून कार्यरत होते. या पदावरूनच ते सेवानिवृत्त झाले. विभागात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात गांगुर्डे यांना निरोप देण्यात आला. यावेळी अनेक अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### रेवती बोरसे यांचे निधन



**सिडको ।** डीजीपीनगर येथील रहिवासी रेवती रमेश बोरसे (वय ७७) याचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक प्रदीप बोरसे यांच्या त्या मोठ्या वहिनी, तर प्रकाश बोरसे यांच्या मातोश्री होत.

# अंबड परिसरातील मूलभूत समस्या सोडवाव्यात

### रिपब्लिकन सेनेची मागणी

**नाशिक ।** अंबड परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, वाहतूक कोंडी, खड्ड्यांमुळे होणारे अपघात तसेच पावसामुळे उघडे पडलेले नाले यांसारख्या मूलभूत समस्यांबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी रिपब्लिकन सेनेने केली आहे. जिल्हाध्यक्ष अविनाश शिंदे व महानगर प्रमुख सुनील साळवे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सिडको विभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

गेल्या दोन वर्षांपासून सीटीआर सर्कल (अंबड) येथे सिग्नल बसविण्याची मागणी होत असून ती अद्याप प्रलंबित आहे. गरवारे पॉईंट ते पपई नर्सरी दरम्यान सायंकाळच्या वेळी दीड तासाहून अधिक काळ वाहतूक कोंडीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. नुकत्याच झालेल्या अपघातात संजूनगर म्हाडा येथे खड्ड्यामुळे दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. त्यामुळे रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व सिग्नलची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. दत्त मंदिर सर्कल परिसरातही प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याने तेथे सिग्नल बसविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली. दातीरनगर ते चुंचाळे घरकुल योजनेकडे जाणारा रस्ता खड्ड्यांनी पोखरला असून अपघातांची मालिका सुरू आहे. मारुती संकुल भागातील नाल्यावरचा पूल मोडकळीला आल्याने तो दुरुस्त करून संरक्षक भिंत उभारण्याची मागणीही केली आहे.पावसामुळे अंबड, दत्तनगर, चुंचाळे भागातील नाले उघडे पडले असून सांडपाणी रस्त्यावर येत आहे. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी पथदीप बंद असल्याने नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. घरकुल योजनेतील घरेही जीर्णावस्थेत असून वरच्या मजल्यावरील स्वच्छतागृहांमधून पाणी गळती होत असल्याने दुर्गंधी व रोगराई पसरत आहे. अतिक्रमण निर्मूलन विभागावरही अन्यायकारक कारवाई केल्याचा आरोप करण्यात आला. धनाढ्यांना अभय देऊन गोरगरिबांवर कारवाई होत असल्याचे नमूद करून ही स्थिती बदलण्याची मागणीही करण्यात आली. रिपब्लिकन सेनेने या सर्व मागण्यांचे तातडीने निराकरण न झाल्यास सिडको विभागीय कार्यालयाला घेराव घालून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.निवेदनावर जिल्हाध्यक्ष अविनाश शिंदे महानगर प्रमुख सुनील साळवे, उपजिल्हाध्यक्ष तुकाराम मोजाड, महिला शहराध्यक्ष सोनाली उजागिरे, प्रसिद्धी प्रमुख सूरज आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अंधश्रद्धेमुळे समाजाची अधोगती : डॉ. पवार

**नाशिक ।** समाज सुदृढ होण्यासाठी विश्वास, श्रद्धेची




आवश्यकता असते. अंधश्रद्धेमुळे गैरसमज निर्माण होतात आणि समाजाची अधोगती होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.किशोर पवार यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात ते १७८वे पुष्प 'अंधश्रद्धेचे ग्रहण' या पुस्तकावर गुंफताना ते बोलत होते. प्रा.चंद्रकांत दराडे अध्यक्षस्थानी होते. डॉ. पवार पुढे म्हणाले की, अंधश्रद्धा ही समाजाला लागलेली कीड आहे. या पुस्तकात नवस,अंधश्रद्धा यासारख्या विषयावर मंथन केले आहे. बहुतांशी लोक वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास न करता विज्ञानाला आव्हान देत अंधश्रद्धेचा अंगीकार करतात, हे आपले दुर्दैव आहे. चमत्काराला नमस्कार करणारा समाज सत्य समजून घेत नाही. विवेकबुद्धी खुंटीला टांगून समाज विनाशाकडे जात आहे. यासाठी समाज जागृतीची गरज आहे, असेही ते म्हणाले.

# सटाण्यात 'श्रीगणेशा आरोग्याचा' मोहीम

### मोफत आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद







**सटाणा ।** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत सटाणा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे आयोजन श्री हेरंब सिद्धिविनायक गणेश मंडळ, साई सावली फाउंडेशन, राजमुद्रा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने तर सिम्स यशोधन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या सौजन्याने करण्यात आले होते. शिबिरात डॉ. प्रकाश जगताप (एम.डी. मेडिसिन), डॉ. संदेश निकम तसेच वैद्यकीय पथकाने नागरिकांच्या मोफत आरोग्य तपासण्या करून वैद्यकीय सल्ला दिला. यावेळी आरोग्यमित्र राहुल तारू यांनी आयुष्मान भारत कार्ड काढणे, विविध शासकीय आरोग्य योजनांची माहिती नागरिकांना दिली. या उपक्रमात किशोर सोनवणे, प्रशांत कोठावदे, भुषण निकम, पंकज सोनवणे, किरण कर्डीवाल, चेतन सूर्यवंशी, योगेश सोनवणे, विजय सोनवणे, प्रफुल कुवर, शुभम शेवाळे, निलेश शेवाळे, शाहरुख शेख, सुदर्शन व्यवहारे, हेमंत सोनवणे, किरण सोनवणे, हर्षल कोठावदे, सचिन कोठावदे आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीततेसाठी सिम्स यशोधन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे रुग्णालय व्यवस्थापक भूषण सोनवणे, गीतांजली सोनवणे, दिनेश गुंजाळ, मयुरी कढरे, सोनाली देसले, अभिषेक जाधव, साहेबराव व्हडगर यांनीपरिश्रम घेतले.

# मराठा समाजाच्या आंदोलनाचे काय होणार?

(अशोक थोरात यांजकडून)

**नाशिक ।** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगेंनी मुंबईत समाजाची ताकद दाखवलीच आहे. कदाचीत दोन लाख मराठे मुंबईत थांबले असावेत. प्रशासनाने दोन लाखांच्या गर्दीमुळे बरेच नमते घेतले आहे. पण आता यात मोठा गुंता वाढला आहे व हा गुंता सुटणे अवघड असुन बहुदा बसायचे तेव्हडे दिवस बसा व कंटाळुन घरी जा अशीच गत व्हायची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांचा द्वेष लपून राहिलेला नाही व या विषयाला बळ देणारे पण जनतेच्या लक्षात आले आहेत. आता मराठा समाजात असंख्य ओ.बी.सी. म्हणजे कुणबी झालेले आहेत. शिक्षणात मागे असल्याने मराठवाडा व विदर्भात मराठा समाजाला कुणबी दाखले काढावेच लागले नाही. पण तेथेच मराठा समाज जास्त आहे. मागच्या तिसऱ्या चौथ्या पिढीतील कुणीतरी कुणबी असला तर कुणबी दाखला सहज मिळतो. पण सर्व बरोबर असले तरच जातपडताळणीत दाखला मिळतो. घाईत काढलेले कुणबी दाखले जातपडताळणीत बाद होतात. समाज खवळतो तेंव्हा शासनाला हतबल करतो तसे आता झाले आहे. ओ.बी. सी. विरूध्द मराठा अशी फुट पडली आहे. लक्ष्मण हाके सारखे लोक ओ.बी.सी.ची बाजु




मांडत आहेत. मराठा समाजाला ओ.बी.सी. मधुनच आरक्षण द्या, अशी स्पष्ट भुमिका शरद पवार, हर्षवर्धन सपकाळ व उध्दव ठाकरे घेत नाहीत. फक्त मनोज जरांगेंना बळ देत आहेत. ओ.बी.सीं.ना धक्का न लावता स्वतंत्र आरक्षण मराठ्यांना देण्याची भुमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांनी व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी जाहीर केल्याने हा गुंता सुटणार नाही. सरकारला अशा आंदोलनांची सवय असते. विरोधक आदोलनाला बळ देतात हे नविन नाही. गोवारी समाजाच्या आंदोलनात शंभराहुन अधिक मरण पावले. स्व.मधुकरराव पिचड यांच्या नावाने शिमगा झाला, पण हळु हळु सर्व शांत झाले. १९८० च्या दरम्यान शेतकरी संघटनेचे स्व.शरद जोशींचे आंदोलन आठवले तर हे आंदोलन किरकोळ वाटते. ते पण सरकारने पचवले व हळु हळु शांत झाले व एक कोटी शेतकरी आंदोलनात असतांना सरकारने ते हाताळले. त्या आंदोलनामुळे काहींचे राजकारणच संपले, पण सरकारला फरक पडला नाही. देवेंद्र फडविसांनाच वैयक्तीक टारगेट करणे राज्यातील जनतेला पटलेले नाही. पण तेही बोलत नाहीत. ओ.बी.सी.मधुन आरक्षण नाही मग हा गुंता सुटणारच नाही. हे सर्व झाले तरी शेवटी न्यायालयात टिकविणे सोपे नाही. म्हणजे हा वणवा हळु हळु शांत होईल. सरकार व विरोधक आपले काम करीत रहातील. सरकार उलथविण्याची मनोज जरांगेंची भाषा असली तरी तसे होणारच नाही हे नक्की. पण स्व.शरद जोशी प्रमाणे मनोज जरांगे राज्याला कायम आठवणीत रहातील. एक साधा माणुस काय करू शकतो हे जनतेला दिसले हे मात्र खरे.

## महत्त्वाचे

### बी. सुदर्शन रेड्डी यांचे डॉ. शोभा बच्छाव यांनी केले स्वागत

**नाशिक ।** उपराष्ट्रपतीपदासाठीचे इंडिया आघाडीचे उमेदवार बी.सुदर्शन रेड्डी यांनी काल मुंबईत काँग्रेसच्या खासदारांची भेट घेतली. देशाची सध्याची स्थिती बिकट असून लोकशाही



तसे संविधान वाचविण्यासाठी मला मतदान करून विजयी करा. मित्र पक्षांनाही तसे सांगा, असे आवाहन रेड्डी यांनी यावेळी केले. प्रारंभी धुळ्याच्या खासदार डॉ.शोभाताई बच्छाव यांनी त्यांचे स्वागत केले.इंडिया आघाडीचे घटकपक्ष म्हणून आम्ही सर्व आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे काँग्रेसच्या खासदारांनी यावेळी सांगून त्यांना शुभेच्छा दिल्या.बी. सुदर्शन रेड्डी यांनी सर्व खासदारांची ओळखही करून घेतली. यावेळी खा.शाहू महाराज,खा.प्रतिभा धानोरकर,खा. वर्षा गायकवाड,खा.गोवाल पाडवी,खा.शिवाजी काळगे,खा.कल्याण काळे,खा.प्रशांत पडोळे,खा. डॉ,किरसान नामदेव,खा.चंद्रकांत हांडोरे तसेच माजी खासदार कुमार केतकर उपस्थित होते. तत्पूर्वी रेड्डी यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्या पक्षाचे खासदार तसेच राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि त्या पक्षाच्या खासदारांचीही भेट घेतली.

### भ्रष्टाचारमुक्त महापालिकेसाठी श्रीगणेशाला साकडे

**नाशिक ।** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकणारे तसेच जनजागृती करणारे देखावे मांडण्याची परंपरा




नितिन देवरे यांच्या घरगुती गणेशोत्सवात कायम ठेवली जाते. यंदा ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचारमुक्त महापालिका घडावी, या उद्देशाने विशेष देखावा साकारण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांपासून महापालिका निवडणुका न झाल्यामुळे रस्ते, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधा नागरिकांना वेळेवर उपलब्ध झाल्या नाहीत. नागरिकांकडून वसूल होणाऱ्या करातून चालणाऱ्या महापालिकेची तिजोरी भ्रष्टाचाराने पोखरली गेली, हे देखील जनतेला चांगलेच ठाऊक आहे. अशा परिस्थितीत आगामी निवडणुकीत उच्चशिक्षित, होतकरू आणि प्रामाणिक तरुणांना उमेदवारी मिळावी व नागरिकांनी त्यांना विजयी करून भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाची पायाभरणी करावी, अशी प्रार्थना देवरे पाटील परिवाराने श्रीगणेशाला घातली आहे. दरवर्षी नव्या सामाजिक विषयावर उभारल्या जाणाऱ्या या देखाव्यांना विविध स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत असतो. “अशा उपक्रमांतून समाजाला स्वच्छ विचारसरणीचा संदेश मिळतो आणि जनजागृती होण्यास मोठी मदत होते,” असे मत गणेशभक्त तसेच मुद्राय फाऊंडेशनचे अध्यक्ष नितिन देवरे यांनी व्यक्त केले.

# कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर विविध विकास कामांना गती : जिल्हाधिकारी

**नाशिक ।** नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे आगामी काळात होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी शुक्रवारी (दि. २९) साधू- महंतांची भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला. कुंभमेळ्यासाठी होणारी विविध विकास कामे वेळेत पूर्ण केली जातील. साधू- महंतांच्या अडी- अडचणी सोडविण्यास प्राधान्य देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

भक्तीधाम येथे जिल्हाधिकारी शर्मा यांनी विविध आखाड्याचे साधू- महंतांशी संवाद साधला. यावेळी अखिल भारतीय संत समितीचे महामंत्री जितेंद्रानंद सरस्वती, आखाडा परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते भक्तीचरणदास महाराज, कैलास मठाचे महंत स्वामी संविदानंद सरस्वती, दिगंबर आखाड्याचे महंत रामकिशोरदास शास्त्री, तपोवनातील बडा लक्ष्मीनारायण मंदिराचे रामशरणदास महाराज, महंत माधवदास राठी, तुषार भोसले आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी शर्मा यांनी सांगितले की, आगामी कुंभमेळ्यानिमित्त विविध विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. दीर्घ कालावधी लागणाऱ्या कामांची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे सर्व कामे वेळेत पूर्ण होतील, अशी दक्षता घेण्यात येईल. जिल्हा प्रशासन साधू- महंतांशी नियमितपणे संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेईल. तसेच त्यांच्या सुचनांची दखल घेऊन त्यावर आवश्यक ती कार्यवाही केली जाईल. साधूग्रामसाठी आवश्यक भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. तसेच लवकरच त्र्यंबकेश्वर येथील साधू- महंतांशी संवाद साधण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी साधू-महंत यांनीही काही मौलिक सूचना केल्या. त्याची लवकरच अंमलबजावणी करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.



**साधू- महंतांबरोबर साधला संवाद**

दरम्यान, प्रशासनाने त्रंबकेश्वर येथे साधू मंत्र्यांशी कुंभमेळ्याच्या तयारी बाबत चर्चा केली. विविध आकारांच्या प्रमुखांशी त्यांनी चर्चा केली विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलद शर्मा आणि इतर सर्व शासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. सिंहस्थ कुंभमेळा जवळ येत असतानाही येथील मूलभूत सुविधांबाबत प्रशासन फारसे गंभीर नसल्याचा आरोप साधुसंतांनी करीत तीव्र नाराजी व्यक्त केली. कुंभमेळ्याच्या कामाबाबत शासन-प्रशासन गंभीर नसल्याची स्थिती असल्याचा खुला आरोपही यावेळी साधुसंतांनी केला. असेल तर सिंहस्थ कुंभमेळा दरम्यान स्थिती कशी असेल अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, यावर विभागीय आयुक्त गेडाम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना महंतांनी सुचवलेले कामे प्राधान्याने करण्याचे आदेश दिले.

# आयुक्तांनी केली गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी



**नाशिक ।** महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या राज्योत्सव अर्थात गणेशोत्सवाची विसर्जन मिरवणूक शनिवारी (दि. ६) मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त मनिषा खत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी करण्यात आली.

पाहणीदरम्यान वाकडीबाराव, दूध बाजार, मेन रोड, धुमाळ पॉईंट, एम.जी. रोड, रविवार पेठ, रविवार कारंजा, अहिल्याबाई होळकर पूल, पंचवटी कारंजा ते रामकुंड परिसर, सरदार चौक, गोदाघाट या महत्त्वाच्या मार्गांचा आढावा घेण्यात आला. पाहणी करताना रस्त्यातील अडथळे, अतिक्रमण, खड्डे बुजवणे तसेच ओव्हरहेड वायर्स व केबल्स तातडीने हटविण्याचे आदेश आयुक्तांनी संबंधित विभागांना दिले. तसेच विसर्जन मिरवणूक काळात शहर परिसर स्वच्छ राहावा यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाला विशेष उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. या पाहणी दौऱ्यात आयुक्तांसोबत अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपआयुक्त अजित निकत, शहर अभियंता संजय अग्रवाल, अधीक्षक अभियंता अविनाश धनाइत, रवींद्र धारणकर, विभागीय अधिकारी तथा नगरसचिव मदन हरिश्चंद्र, चंदन घुगे, कार्यकारी अभियंता संदेश शिंदे, गणेश मईड, उपअभियंता समीर रकते, प्रशांत बोरसे आदी अधिकारी उपस्थित होते. पाहणी झाल्यानंतर आयुक्तांनी दिलेल्या सूचनांचे तात्काळ पालन करून विसर्जन मिरवणूक मार्ग सुस्थितीत व सज्ज ठेवण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले. यावेळी नागरिकांना आवाहन करताना आयुक्त खत्री म्हणाल्या की, "नाशिककरांनी जसा पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करतआहे, तसेच गणरायाचे विसर्जनही पर्यावरणपूरक पद्धतीने करावे. त्यामुळे गोदावरी नदी व शहरातील इतर नद्या प्रदूषित होणार नाहीत याची काळजी घेणे हे सर्वांचे कर्तव्य आहे, असे आवाहन गणेशभक्ताना केले.

# अमली पदार्थविरोधी देवळाली कॅम्प शहरात जनजागृती रॅली

**देवळाली कॅम्प ।** येथील शिवयूवा प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळ यांच्या संकल्पनेतून देवळाली कॅम्प पोलिस ठाणे यांच्या सहकार्यातून वतीने देवळाली कॅम्प शहरातून अमली पदार्थ विरोधी व तंबाखू मुक्त शाळा जनजागृती रॅली काढण्यात आली.देवळाली कॅन्टोनमेन्ट बोर्ड हायस्कूल शाळेपासून काढण्यात आलेल्या रॅलीत पोलिस निरीक्षक श्रीनिवास देशमुख, शिवयुवा प्रतिष्ठान अध्यक्ष प्रमोद मोजाड,मुख्याध्यापिका राजेश्री खैरनार सहभागी झाले होते.तत्पूर्वी शाळेच्या



प्रांगणात आयोजित कार्यक्रमात पोलिस निरीक्षक श्रीनिवास देशमुख यांनी अमली पदार्थ व तरुण पिढी त्याच्या आहारी कशी जात आहे? याचे उदाहरणे सांगितली. स्वच्छता, अमली पदार्थ यांविषयी समाजात, परिसरात जनजागृती करण्यासाठी विद्यार्थी कोणती भूमिका पार पाडू शकतात, याबाबत मार्गदर्शन केले. प्रत्येकाने शपथ घेऊन हा लढा द्यायचा आहे. यासाठी आपण जागृत होणे गरजेचे आहे. मुख्याध्यापिका खैरनार यांनी स्वच्छतेचे महत्त्व स्पष्ट केले. शिवयुवा प्रतिष्ठान अध्यक्ष प्रमोद मोजाड यांनी स्वच्छता व अमली पदार्थ शरीराला हानिकारक कसे आहे हे सांगितले. त्यानंतर संपूर्ण शहरातुन जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. विदयार्थांनी घोषणा देत हातात स्वच्छता जागृती, अमली पदार्थ विरोधी जनजागृती फ्लेक्स धरून विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीमध्ये इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी ठिकठिकाणी अमली पदार्थ विरोधात आधारित पथनाट्याचे सादरीकरण केले. यावेळी पोलिस हवालदार राजेंद्र मोजाड, महिला पोलिस आश्विनी जाधव ,आदींसह शिक्षक प्रमोद वैदय, जगदीश धोंगडे,जयमाला पाटोळे,राजेंद्र ताजनपुरे आदी उपस्थित होते. अध्यक्ष प्रमोद मोजाड यांनी प्रास्ताविक केले. आभार मुख्याध्यापिका राजश्री खैरनार यांनी आभार मानले.

# त्र्यंबकेश्वर व्हीआयपी दर्शन प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा

## माजी विश्वस्त ललिता शिंदे यांचा दंड रद्द

**नाशिक ।** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरातील व्हीआयपी दर्शनाविरोधात दाखल याचिकेत माजी विश्वस्त ललिता शिंदे यांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या याचिकेला नकार देत त्यांच्यावर एक लाख रुपयांचा दंड ठोठावला होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा हा निर्णय रद्द केला असून शिंदे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



त्र्यंबकेश्वर देवस्थान समितीकडून व्हीआयपी दर्शनासाठी दोनशे रुपये प्रतिव्यक्ती शुल्क आकारले जाते. याविरोधात ललिता शिंदे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून पेड दर्शन पद्धती बंद करण्याची मागणी केली होती. पेड दर्शनामुळे देवदर्शनात दुजाभाव होतो तसेच गरीब भक्तांना अन्याय सहन करावा लागतो, असे कारण त्यांनी आपल्या याचिकेत मांडले होते. सुनावणीत उच्च न्यायालयाने मंदिर प्रशासनाच्या बाजूने निर्णय देत असे नमूद केले होते की ज्यांना पैसे भरायचे नाहीत त्यांना सामान्य रांगेतून दर्शनाची सोय उपलब्ध आहे. भक्तांवर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे शिंदे यांची याचिका ग्राह्य धरता येणार नाही असे ठरवत त्यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. या निर्णयाविरोधात शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर उच्च न्यायालयाचा दंडाचा आदेश रद्द केला. त्यामुळे ललिता शिंदे यांना दिलासा मिळाला आहे. या निकालामुळे त्र्यंबकेश्वर मंदिरातील व्हीआयपी दर्शन पद्धती पुन्हा चर्चेत आली असून पुढील सुनावणीत या प्रश्नाचा अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. भक्तांमध्ये पेड दर्शनाला विरोधाचे सुर यापूर्वी देखील उमटलेले होते मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे या वादावर आता कायदेशीर तोडगा निघणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सुभाष घुगे यांच्यासारखी माणसं समाजासाठी आदर्शवत : शिवाजी मानकर






**नाशिक ।** प्रामाणिकपणा व निष्ठा या दोन गुणांच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपली कर्तबदारी सिद्ध करणाऱ्या सुभाष घुगे यांच्यासारखी माणसं समाजासाठी आदर्शवत असतात. त्यामुळेच त्यांची सेवा समाप्ती क्लेशदायक असली तरी ती स्वीकारावी लागते, असे मत मंत्रालयातील माहिती व प्रसारण संचनालयाचे माजी संचालक शिवाजी मानकर यांनी व्यक्त केले. मनपाचे अधिकारी सुभाष घुगे यांना सेवानिवृत्ती निमित्ताने झालेल्या निरोप समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनपाचे कर उपायुक्त अजित निकम होते.

प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हा प्रमुख व मनपाचे माजी विरोधी पक्ष नेता अजय बोरस्ते, मनपाच्या माजी स्थायी समितीच्या सभापती हिमगौरी आहेर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, यशवंत राव चव्हाण मुक्त विद्यापीठ अधिकारी प्रेमनाथ सोनवणे, विशेष कार्यकारी अधिकारी श्रीकांत पवार, समाजकल्याण विभाग मनपाचे उपायुक्त नितीन नेर उपस्थित होते. श्री मानकर यांनी घुगे यांचा जीवनपट सभागृहात सांगितला प्रचंड मेहनत व कष्ट केल्यानंतर ते या पदापर्यंत येऊन पोहोचले होते आयुष्यात सचोटीने देखील कारभार करता येतो हे सुभाष घुगे यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वामुळे स्पष्ट होते त्यांनी मनपाचे कर्मचारी म्हणून मनपाची सेवा केली नाही तर त्या माध्यमातून जनतेची ही सेवा केली त्यामुळे त्यांचे हे जीवन सार्थकी लागले. यावेळी अजय बोरस्ते, पंढरीनाथ थोरे, दैनिक 'महासागर'चे संपादक प्रा. जयंत महाजन आदींची भाषणे झाली. यावेळी एकनाथ दिघोळे, अभिजीत दिघोळे, श्यामराव शिंगवेकर, ज्ञानेश्वर सांगळे, सचिन हेकरे, नाना लहानगे, विजय गीते, प्रकाश सानप, पवन सानप, अतुल नागरे, प्रेमनाथ सोनवणे, अमृता सोनवणे, सुधीर देशपांडे, उत्तम मेहेंदळे, उत्तम सोनवणे, भाऊसाहेब पुंड, भाऊसाहेब काळे, एकनाथ गंभीरे, सचिन गंभीरे उपस्थित होते. महिला कर्मचा-यांपैकी वनिता लोंढे, कल्पना डेरले, संगीता उपासनी, राजश्री जैन, मनिषा तहसीलदार यांनीही मनोगत व्यक्त केले. उपस्थित मुली अश्विनी, रोहिणी, श्वेता, शीतल, आदिती यांना भावना अनावर होऊन त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. सुभाष घुगे यांच्या पत्नी दया, मुले अमित, प्रणव यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन मिलिंद राजगुरू यांनी केले. तर मनोज खैरनार यांनी आभार मानले.

# नाशिक महापालिकेत यंदा ‘हंड्रेड प्लस’ पार होणारच...

## भाजपा शहराध्यक्षांचा विश्वासपूर्वक दावा । कोणालाही उमेदवारीसाठी शब्द दिलेला नाही : सुनील केदार

आगामी होऊ घातलेल्या नाशिक महापालिका निवडणुकीत भाजपा एकहाती सत्ता हस्तगत करताना ‘हंड्रेड प्लस’ पार करणारच, असा विश्वासपूर्वक दावा भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार यांनी दैनिक "महासागर"शी बोलताना केला. उमेदवारीसाठी पक्षाने कोणालाही शब्द दिलेला नाही, असे सांगतानाच आयारामांची अपरिहार्यता असल्याने ते भाजपात येत आहेत; भाजपची गरज म्हणून नव्हे, असे त्यांनी ठणकावून सांगितले.





आगामी निवडणुकीसाठी सारे राजकीय पक्ष, संघटना, इच्छुक मंडळी जोरदार तयारीला लागली आहेत. मोर्चेबांधणी करीत आहेत. त्या पार्श्वभूमीवर भाजपची निवडणुकीतील नेमकी भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता केदार यांनी "हंड्रेड प्लस"ची जोरदार री ओढली. त्यांनी गेल्या निवडणुकीत महापालिकेत भाजपचे निवडून आलेले नगरसेवक, भाजप सोडून गेलेले नगरसेवक आणि दुसऱ्या पक्षातून भाजपात आलेले नगरसेवक यांची आकडेवारी सादर करीत गेल्या निवडणुकीत क्रमांक दोनवर असलेल्या भाजपच्या उमेदवारांचा दाखला देत "हंड्रेड प्लस" सहज शक्य असल्याचा जोरदार दावा केला. १०४७ बुथवर प्रत्येकी १२ कार्यकर्ते अशा रचनेनुसार भाजप निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे स्पष्ट करीत मेरिटनुसार आम्हाला महायुतीही मान्य राहील, असेही त्यांनी सांगितले.

गेल्या निवडणुकीत पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावरील मते विचारात घेतली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. या मुद्द्याचा आधार घेत भाजप विद्यमान स्थितीत ११० जागांवर अग्रणी असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. गेल्या निवडणुकीत भाजपचे ६६ नगरसेवक निवडून आलेले होते. त्यापैकी ११ नगरसेवक सोडून गेल्याने महापालिकेतील सदस्य संख्या पंचायत ५५ झाली. दुसऱ्या पक्षातून १२ नगरसेवक भाजपात आले. त्यामुळे सदस्य संख्या ६८ झाली. याशिवाय ४२ जागांवर भाजपचे सदस्य क्रमांक दोनवर होते. ते सर्व धरून भाजपकडे विद्यमान स्थितीत ११० जागा असल्याचा दावा सुनील केदार यांनी केला. महापालिकेच्या १२२ जागांपैकी ११० जागांवर भाजपच अग्रणी असल्याने भाजपला आगामी निवडणुकीत "हंड्रेड प्लस" जागा मिळवणे अवघड नसल्याची मल्लिनाथीही त्यांनी यावेळी केली. "मेरीट" हाच निकष महायुतीतून निवडणुका लढवताना लावला जाईल. मेरिटनुसार जागा वाटप करण्यावरच केदार यांनी बोलताना भर दिला.




दीपक भावसार
८३२९४६०२३०

गेल्या काळात भाजपमध्ये आयारामांचे भरपूर पक्षप्रवेश झाले. अजूनही होत आहे आणि यानंतरही होणार आहेत. असे असले तरी पक्षांनी निवडणुकीसाठी कोणालाही शब्द दिलेला नसल्याचे त्यांनी पुन्हा ठणकावून सांगितले. येणाऱ्यांची अपरिहार्यता असल्याने ते येत आहेत; भाजपची गरज म्हणून नव्हे, असे सांगायला केदार विसरले नाही. आगामी निवडणुकीत भाजपने सर्व्हेनीतीचा अवलंब करण्याचे निश्चित केले आहे. आयबी, अनुलोम,



आरएसएस आणि भाजप यांच्या सर्व्हेला महत्त्व दिले जाणार आहे. प्रत्येकाचाच सर्व्हे होणार असून, सर्व्हे रिपोर्ट पाहून त्यानुसारच उमेदवारीचा विचार होऊ शकणार आहे. हा सर्वे ए बी सी डी यानुसार वर्गवारी केला जाणार असून, सर्व्हे रिपोर्टवरच इच्छुकांच्या उमेदवारीचे भवितव्य अवलंबून राहणार असल्याचे केदार यांनी सांगितले. त्यामुळे कोणालाही शब्द दिलेला नाही. सर्व्हे रिपोर्टमुळे कदाचित धक्कादायक परिणाम दिसू शकतील, असे स्पष्ट करीत सच्चा कार्यकर्त्यांना न्याय मिळेल, असे त्यांनी विश्वासाने सांगितले.

### विरोधकांचा केवळ नकारात्मक प्रचार

यावेळी केदार यांनी काँग्रेसचा प्रत्यक्ष उल्लेख न करता विरोधक नरेटिव्हचा आधार घेत असल्याचे सांगितले. भाजपने मतांची चोरी केल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जातो. मग लोकसभा निवडणुकीत विरोधकांना यश कसे प्राप्त झाले. तेथे मतचोरी झाली नाही का, असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला. विरोधकांकडे मुद्दे नसल्याने साप साप म्हणत भुई थोपटली जात असल्याचे केदार म्हणाले. केदार यांना शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत जरा छेडले असता त्यांनी गुन्हेगारी हा न संपणारा विषय आहे, असे सांगत भाजपच्या कारकिर्दीत गुन्हेगारीचा आलेख मात्र कमी झाल्याचे धाडसी वक्तव्य करीत विषयाला बगल देण्याचा प्रयत्न केला. आगामी निवडणुकीत आयाराम आणि भाजपचे पदाधिकारी-कार्यकर्ते एकदिलाने काम करतील आणि महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता येईल आणि ‘हंड्रेड प्लस’ पार होईल, असा विश्वासही शेवटी त्यांनी व्यक्त केला.

# गणेशाची रुपे आगळी

**सध्या अवघे समाजमन गणेशोत्सवाच्या तयारीत गर्क आहोत. लवकरच नेहमीच्या उत्साहात गणेशाचे आगमन होईल. मात्र पूजा करताना ही देवता नेमकी कोण आहे, कालौघात तिची ओळख, स्वरूप कसे बदलत गेले, पुराणे याबद्दल काय सांगतात हेदेखील जाणून घेण्याजोगे आहे. गणपतीबाबतही अनेक संशोधकांनी संशोधन केले असून बरीच माहिती समोर आली आहे. त्या अनुषंगाने घेतलेला वेध.**

यावे गणराय

डॉ. अंबरीष खरे, ज्येष्ठ अभ्यासक

श्री गणेश हा विघ्नहर्ता, सुखकर्ता आहे. या स्वरूपातच आपण गणेशाचा विचार करतो. परंतु गणपतीसंदर्भातील आख्यायिका, उपलब्ध असणारी पुराणे, कथा यातून समोर येणाऱ्या माहितीनुसार ही देवता मुळात विघ्नांचा राजा असणाऱ्या 'विघ्नराज' या स्वरुपाची आहे. 'विघ्नेश्वर' हे गणपतीचे नाव सगळीकडे आलेले दिसते. शिव-पार्वतीच्या या म ुलाकडे विघ्नांचे आधिपत्य दिले होते. अर्थातच यामुळे तो विघ्नांचा स्वामी झाला. असे असताना विघ्नांपासून स्वत:चा बचाव करायचा असेल तर गणेशाची प्रार्थना केली पाहिजे आणि विघ्न आणणे तसेच दूर करणे या गोष्टी त्याच्या अधीन आहेत हे ओळखून सेवा केल्यास तो तुम्हाला साह्य करू शकतो हा विचार पुढे आला.

'विनायक' हे गणपतीचे नाव अनेकदा वापरलेले दिसते. हा देखील अधिपती असणारा एक देव असून आज आपण त्याला गणेशस्वरूपातच बघतो. पण उत्तर-वैदिक साहित्याच्या उत्पत्तीकाळात, साहित्यग्रंथ तयार होताना मानवगृह्यसूत्र, अथर्ववेदीय शान्तिकल्प यासारख्या ग्रंथांमध्ये आपल्याला चार विनायकांचे वर्णन सापडते. हे विनायक लोकांना ग्रासू, झपाटू शकत असत. एखाद्याच्या मागे संकटांचा ससेमिरा लावण्याची, अहित करण्याची, मानसिक अशांती निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती. म्हणजेच यांच्या प्रभावाने विद्यार्थ्यांचा विद्याभ्यास होणार नाही, वाण्याचा व्यवसाय होणार नाही, अध्यापकाला आचार्यपद मिळणार नाही असे वर्णन सापडते. अशा प्रकारे झपाटले गेलेल्या व्यक्तीला विचित्र स्वप्ने पडणे, मुंडण केलेले वा जटा वाढवलेले लोक स्वप्नात दिसणे, रस्त्यावर जाताना आपल्या पाठीमागे कोणी तरी येत असल्याचा भास होणे अशी काही लक्षणे दिसतात, अशी माहिती ग्रंथांमध्ये आहे.

यातून बाहेर पडण्यासाठी विनायकांची शांती करण्याचे सूचित केले आहे. इथे विनायकस्नपन नावाचा विधीही सांगितला आहे. यात त्यांची स्थापना करुन पूजन करणे, विविध प्रकारचे नैवेद्य दाखवणे, अग्नी प्रज्वलित करून त्यात आहुती देणे असा पूजाविधी सांगण्यात आला आहे. या चार विनायकांची नावे शालकटंकट, कूष्म ाण्डराजपुत्र, उस्मित आणि देवयजन अशी आहेत.

वेदांमधील 'गणानां त्वा गणपत हवामहे' या प्रसिद्ध ऋचेमध्ये 'ज्येष्ठराज' असा शब्द येतो. यावरुन 'ज्येष्ठा' नावाच्या देवतेचा प्रमुख वा तिच्याशी संबंधित असणारा असा हा गणपती आहे का, असा प्रश्न संशोधक उपस्थित करतात. 'ज्येष्ठा'चा अर्थ थोरली. ज्येष्ठागौरी आपल्याला माहीत आहे, ती अलक्ष्मीचे प्रतीक म्हणून. लक्ष्मी असते तेथे अलक्ष्मी नसते हेही आपण जाणतो. आजही गावांमध्ये 'अक्काबाईचा फेरा आला' असं म्हण- तात. ही अक्काबाई म्हणजेच अलक्ष्मी. अलक्ष्मी येते आणि तुमच्याकडील धनधान्य, संपत्ती, आरोग्य घेऊन जाते, अशी एक कल्पना आपल्याकडे दिसते. थोडक्यात, या त्रासदायक देवता आहेत पण पूजा केली तर त्यांचा लोभ राहतो आणि तुमचे कल्याण होते, अशा स्वरूपाचा विचार वा देवतांचे असे स्वरूप प्राचीन काळी असावे. त्यामुळे ज्येष्ठा गौरीचे आगम नही एरवी वाईट मानल्या जाणाऱ्या मूळ नक्षत्रावर होते.



पुराण वाङ्मयाच्या पुढच्या काळातही आपल्याला गणपतीच्या कथा आढळतात. याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये आधी उल्लेख केल्याप्रमाणे चार विनायक नसून ही सर्व नावे एकाच विनायकाची आहेत आणि त्याचे पूजन केले असता सर्व विघ्नांमधून मुक्ती मिळते, हा विचार समोर आलेला दिसतो.

मधल्या काळात झालेला हा बदल विचारात घेण्याजोगा आहे. त्यामुळेच या काळात विघ्ने दूर करण्यासाठी विनायकाचे पूजन करण्यास सांगितले गेल्याचे दिसते. गणपतीच्या जन्माच्या गोष्टी प्राचीन ग्रंथांमधून समजतात आणि तो गजमुख असण- ारा देव असल्याचेही समजते. मात्र आधीच्या चार विनायकांचे सविस्तर वर्णन उपलब्ध नाही. त्यामुळेच ते गजमुख होते की नाही, त्यांचे स्वरूप नेमके कसे होते हे सांगता येत नाही. पण पुराणकथांमधून गणपतीची मूर्ती मात्र स्पष्ट होत जाते. त्याला किती हात आहेत, डोके कसे आहे, हातात कोणकोणती आयुधे आहेत हे सगळे वर्णन या कथांमध्ये केलेले दिसते. प्राचीन काळच्या गणेशमूर्ती भारतातच नव्हे, तर भारताबाहेरही सापडतात. शिव आणि ब्रह्मदेवाने त्याला गणांचा अधिपती केले आणि तो मुख्य झाला, पूजनात त्याचे अग्रमानांकन ठेवण्याची पद्धत पडली, हेदेखील पुराणांमधून समजते. विघ्न आणण्याची ताकद असणाऱ्या देवतेचे पूजन पहिल्यांदा करून त्याला शांत केले तर पुढचे कार्य चांगल्या प्रकारे पार पडेल, असा विचार त्यामागे दिसतो.

नंतरच्या काळात गणेशाचे पूजन करणारा 'गाणपत्य' हा एक संप्रदाय प्रसिद्ध झाला. आपल्याकडे पंचायतन पूजा असते. त्यात एक देवता मध्यभागी तर चारही बाजूंनी चार देवता असतात. शिव, विष्णू, सूर्य, गणेश आणि देवी (अन्नपूर्णा) अशा पाच देवतांचे यात पूजन असते. हे पूर्वापार प्रचलित होते. पण आदिशंकराचार्यांनी याचा जास्त प्रसार केला. यामागचा त्यांचा विचार महत्त्वाचा होता. तो म्हणजे तुम्ही शैव असाल तर शिव मध्यभागी ठेवा आणि उरलेल्या चार देवतांचीही पूजा करा. यातून अन्य देवतांचा द्वेष करण्याचे काही कारण नाही, हा विचार मांडला असावा. गणेशाला प्रधान मानणारे लोक गाणपत्य असतात. पंचायतानाही गणेश आहे, हे लक्षात घेण्याजोगे आहे. त्यानंतरच्या काळात गाणपत्य संप्रदायातही वेगवेगळे उपपंथ तयार झाले. खेरीज गणेशपुराण आणि मुद्गल पुराण ही दोन पुराणे गणेशाशी संबंधित असून आपल्याला माहीत असणारी बरीचशी स्तोत्र, पूजाविधी, वेगवेगळ्या आख्यायिका, कथा यांचा मुख्य स्रोत ही दोन पुराणेच आहेत.

आपल्याकडे तंत्रमार्ग होता. यातही गणप- तीची उपासना केली जात असे. गणपतीचे 'एकदंत' हे एक स्वरूप आहे. दुसरा दात परशुरामाशी झालेल्या युद्धात तुटला होता. एकदंत स्वरूपातील गणेश महागणपती म्हणून ओळखला जातो. सृष्टीची निर्मिती करणारे आदितत्त्व या स्वरूपात त्याच्या या रूपाकडे काही परंपरांमध्ये पाहिले जाते. म्हणजेच ब्रह्मदेवाची निर्मितीही महागणपतीने केली, असे म ानले जाते. असाच 'हरिद्रा गणपती' आहे. विशेषत: याच गणपतीची पूजा करणारा एक संप्रदाय होता. त्या काळी गणपतीचा चेहरा आणि एक दात असा एक लोखंडी ठसा तापवून तो अनुयायांच्या हातावर उमटवला जायचा. हा शिक्का ते अभिमानाने अंगावर मिरवत असत. याच प्रकारे वाममार्ग या पद्धतीनेही गणपतीची पूजा करण्याचा प्रघात होता. 'उच्छिष्ट' गणपती हे त्याचे एक स्वरूप दिसते. इथे लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे तंत्रामध्ये जातीपातीला, स्त्री-पुरुष भेदाला महत्त्व नाही. त्यामुळे सर्व लोक या उच्छिष्ट गणपतीची पूजा करत असत. त्याला मद्य, मांस, मत्स्य यांचा नैवेद्य दाखवला जात असे.

बुद्धीची देवता असूनही ऐश्वर्य प्राप्त व्हावे म्हणूनही गणपतीची पूजा केली जात असे. संपत्ती प्राप्त होण्यासाठी त्याची पूजा करण्याचे विधी सापडतात. 'संतान गणपती' पुत्रप्राप्तीच्या हेतूने पूजला जातो. यावरून गणेश ही देवता सगळीकडे प्रचलित होती, हे स्पष्ट होते. प्राचीन काळी तो विघ्नांचा अधिपती होता, पण कालौघात सुख, संपत्ती, संतान असे सर्व काही देणारा, सकलदाता असा देव ठरला. या देवतेचा सगळा प्रवास जाणून घेणे, त्याची 'सगळ्या मनोकामना पूर्ण करणारा देव' अशी ओळख बनणे हे सगळेच अभ्यासण्याजोगे आहे. भाद्रपद आणि माघ महिन्यातील चतुर्थींना गणेशाचा उत्सव मोठ्या प्रमाणात केला जातो. पार्थिव याचा अर्थ मातीपासून बनवलेला. या पार्थिव गणपतीचे पूजन विशेष करून भाद्रपदात केले जाते. मातीच्या गणपतीची पूजा हे भाद्रपदातील पूजेचे वैशिष्ट्य होय. आता हाच उत्सव आपण साजरा करणार आहोत. तेव्हा या उत्सवाची जोमाने तयारी पूर्ण करू या आणि पूजन करून गणेशाचे आशीर्वाद प्राप्त करू या!

# वैशिष्ट्यपूर्ण गणेश दर्शन

लक्षवेधी गणेश

अंतरंग

कोणतंही मंगल कार्य करण्यापूर्वी आपण श्री गणेशाची प्रार्थना करतो. 'हे गणनायका, हाती घेतलेलं काम कोणत्याही प्रकारचं विघ्न न आणता किंवा येता तडीस जाऊ दे,' हाच प्रत्येक प्रार्थनेचा आशय असतो. गणेशाच्या नावातही हाच अर्थ सामावला आहे. सुखकर्ता, दु:खहर्ता, विघ्नविनाशक मोरया हे विधान त्याचच प्रतीक आहे. गणपतीला बुद्धिची देवता मान- तात. गजाननाच्या प्रार्थनेने नैतिक सामर्थ्य प्राप्त होतं. प्रत्येक आकारातील, विविध प्रकारचा, स्वरुपाचा मोरया आपल्याला आकर्षित करतो. त्याचं प्रत्येक रुप लोभस असतं.

नगरच्या ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयात स्वतंत्र गणेश दालनाची निर्मिती करण्यात आली आहे. विविध प्रकारच्या ३५० गणेशमूर्तींचं इथे एकाच वेळी दर्शन घडतं. प्रत्येकामागे दडलेली कथा निराळी, प्रत्येकाचा इतिहास वेगळा. कोणी पेशवाईशी आपलं नातं सांगतो तर कोणी ज्ञानेश्वरांचा काळ सांगतो. नाशिक येथील डॉ. विनय ठकार, डॉ. प्रतिभा ठकार, श्री. बापट, नागपूर येथील पु. शं. साठे यांनी संग्रहातील काही गणेशमूर्ती नगरच्या वस्तुसंग्रहालयाला दिल्या. संग्रहालयात वैशिष्ट्यपूर्ण अशी तांत्रिक गणेशाची मूर्ती आहे. ही मूर्ती नगर तालुक्यातील रुईछत्तीशी येथील गावकऱ्यांनी संग्रहालयाला दिली. दीड फूट रुंद आणि दोन फूट उंच असलेली ही मूर्ती दगडी चिऱ्यावर उठावाच्या पद्धतीने कोरली आहे. मूर्तीच्या पाठीशी आयताकृती चौकोन आणि त्या भागावर मूर्तीचा जो प्रत्यक्ष भाग येतो त्यावर गणेशाचा प्रणवासहित (ओमसहित) गूढ बीजमंत्र कोरला आहे. उजव्या सोंडेच्या या गणपतीच्या शरीराची रचना अक्षरलिपीत असून त्यामुळे मूर्तीचा आकार वैशिष्ट्यपूर्ण झाला आहे. या गणेशमूर्तीचे हात मोकळेच आहेत, पण पायाशी उंदीर आहे. महागणपती या तांत्रिक देव- तेचे बीजाक्षर 'ओम ग ओम' आहे. तंत्रशास्त्रातील बिंदू, कला, नाद, परिभाषिक, सांकेतिक आकृत्या या मूर्तीत स्पष्ट जाणवतात.

बाराव्या शतकातील षड्भुजा गणेशाची मूर्तीही या दालनात आहे. डोक्यावर बसलेली महादेवाची पिंड हे या मूर्तीचं वैशिष्ट्य होय. ज्ञानेश्वरीत संत ज्ञानेश्वरांनी या मूर्तीचं वर्णन केलं आहे. नगरच्या अमृतेश्वराच्या मंदिर परिसरातील पूर्वीच्या जाधववाड्यातील बाराव्या शतकातील गजाननाची मुर्ती इथे पहायला मिळते. ही नगर शहरातील पहिली गणेशमूर्ती. नवव्या शतकातील एक फूट उंचीची मूर्ती आपलं लक्ष वेधते. डाव्या खांद्यावरून तिहेरी जानवं असलेल्या या गणरायाच्या मूर्तीचे अलंकार आदिवासी समाजातील अलंकारासारखे आहेत. घोडेगाव येथील सोळाव्या शतकातील गणेशाची दगडी शिल्पं हे या संग्रहालयाचं वैशिष्ट्य. मंगल कलशावर उभ्या असलेल्या या मूर्तीला नागाचा कंबरपट्टाही आहे.



पोवळ्यावर कोरलेली दुर्मिळ गजाननाची मूर्ती इथे आढळते. एक सेंटीमीटर उंचीची आणि आठ मिलीमीटर रुंदीची ही मूर्ती पेशवेकालीन आहे. पोवळ्यावर छन्नी चालत नाही. एका छोट्या डबीत कापसात ही मूर्ती ठेवली आहे. तांब्या, पितळ्याचे ओतकाम केलेल्या पंधरा-वीस सुखकर्त्याच्या मूर्ती तुम्ही इथेच बघू शकता. तांडवनृत्य करणारा काचेचा मोरया आपल्या डोळ्यांना भुरळ पाडतो. लाकडातून कोरलेला नवमुखी गणेश, तबला डग्गा वाजवणारा विनायक, स्फटिकात कोरलेला अभेय, मिश्र धातू, दगड शाडू, प्लास्टर, फायबर, मेण या माध्यमांद्वारे साकारलेल्या गजाननाच्या मूर्ती या दालनात आहेत. लाल-हिरव्या खड्यांपासून वॉल हँगिंग स्वरुपातील गणेश मूर्ती, निद्रिस्त गणेश, काष्ट गणेश, सुप- ारीत साकारलेला विघ्नविनायक, त्रिमुखी गणेश, संगमरवरी मूर्तीचा समावेशही दालनात आहे.

गणेशोत्सवाच्या काळात काही सार्वजनिक गणेश मंडळं गणेशमूर्तीचं विसर्जन न करता संग्रहालयाला भेट देतात. अशा मूर्तीही इथे आहेत. तांब्या-पितळ्याच्या ५१ हजार नागण्यातून साकारलेली भव्य मूर्ती इथे आहे. विघ्नविनायक, त्रिमुखी गणेश, संगमरवरी मूर्तींचा समावेशही या दालनात आहे.

ही नाणी चौथा राजा एडवर्ड, पाचवा जॉर्ज या काळातील. या नाण्यांचं वजन ३० किलो आहे. यात सगळ्यात अलीकडचं नाणं १९६३ मधील आहे. १८व्या शतकातील अडीच फूट उंचीचा गजानन पाहिल्यावर आपले हात नकळत जोडले जातात. गणप- तीची मूर्ती कोणत्याही आकारातील, प्रकारातील असो; तिचं रुप विलोभनीय असतं. जाती, धर्माच्या सर्व भेदांना गणेशोत्सव छेद देतो आणि समाजहितासाठी हेच महत्त्वाचं!

# झगमगते अर्थकारण

आजची महागाई पाहता आपण वर्गणी म्हणून देत असलेला पैसा केवळ रोषणाई आणि सजावटीवर खर्च केला जाऊ नये अशी वर्गणीदारांची अपेक्षा असणार यात शंका नाही. पण ही अपेक्षा क्वचितच पूर्ण होते. घरगुती गणपती, सजावटीचे सामान, पुजेचे साहित्य तसेच सार्वजनिक गणपती, त्यांची सजावट, पुजेचे साहित्य असा हा खर्च, शिवाय सार्वजनिक मंडळे काही उपक्रम राबवत असतील तर त्याचाही खर्च यात समाविष्ट करायला हवा. गणेशोत्सवाच्या काळात बाजारात होणारी आर्थिक उलाढालही काहीशे कोटींची असते. सार्वजनिक गणेश मंडळांचे हिशेब वेगळे असतात. गणेशोत्सव आता राजकीय आखाडाही बनला आहे. अनेक नेते गणेशोत्सवातून आपापली ताकद आजमावत असतात, कार्यकर्त्यांना जवळ करत असतात. महान- गरांमधील सार्वजनिक गणेश मंडळे काही ना काही सामाजिक उपक्रम वर्षभर राबवत असतात. पण लहान शहरे, उपनगरे, वस्ती पातळीवरील गणेश मंडळे वर्गणीतून मिळालेल्या पैशाचा विनियोग कसा करतात हा संशोधनाचा विषय आहे. अनेक वेळा एकाच वस्तीत तीन-तीन, चार-चार गणेशमंडळे असतात. वास्तविक याची गरज नसते. पण आपापसातील स्पर्धा आणि भांडणे यामुळे प्रत्येकजण स्वतंत्र गणेश मंडळ स्थापन करतो. अशा वेळी वर्गणी देणारे लोक मात्र तेच असतात. एकाच भागातील चार-चार गणेशमंडळांना वर्गणी देता देता लोकांची पुरेवाट होते. ही मंडळे मिळालेल्या वर्गणीतील साठ टक्के रक्कम सजावट, स्पीकर, मंडप आणि मिरवणुकीवर खर्च करतात. उरलेली रक्कम गणेशमूर्ती आणि पूजा यावर खर्च केली जाते. सोसायट्यांमध्येही गणपती बसवले जातात. या सोसायट्या सजावट, मिरवणूक यावर फारसा खर्च करत नाहीत. त्यांचा सगळा भर असतो तो मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर.

मंडप उभारणी, प्रकाश व्यवस्था, सजावटीच्या वस्तू तयार करणाऱ्या व्यक्तींना यातून रोजगार मिळतो. गणेशोत्सव मंडळांच्या देखावे, सजावट यांच्या स्पर्धा असतात. बक्षिसाच्या आशेनेही या देखाव्यांवर आणि सजावटींवर वारेमाप खर्च केला जातो. गणेशोत्सव मंडळांचे अर्थकारण या विषयाकडे अद्याप गांभिर्याने पाहिले गेलेले नाही. पारतंत्र्याच्या काळात सामाजिक जाणिवांनी अनेक तरूण जसे पेटून उठले होते तसे चित्र आज दिसत नाही. सामाजिक कुप्रथा, भेदभाव, भ्रष्टाचार याविरोधात काही करण्यासाठी गणेशोत्सवाचा उपयोग होताना दिसत नाही.

# उत्सवात पावित्र्य हवं

सेलिब्रिटी गणेशोत्सव

गिरीजा ओक



आमच्याकडे दीड दिवसाचा गणपती असतो. अर्थातच सगळं साग्रसंगीत पार पाडताना भरपूर पळापळ होते. पण त्यातच खरा आनंद दडलाय. आमच्याकडे फारशी आरास करत नाहीत. सोवळ्यात गणपती असल्यानं तिथं लागालाग झालेली अजिबात चालत नाही. त्यामुळे थोडीफार फुलं आणि मोजक्या लाईटच्या माळा सोडून आरास करतो आणि गणपती बसवतो. अलीकडे तर आईकडे एक संगमरव- राची मूर्ती करून घेतली आहे. आम्ही तिच मूर्ती विसर्जित करतो. म्हणजेच उपचारादाखल दोन मिनिटं पाण्यात ठेवतो आणि स्वच्छ करून पुढच्या वर्षीसाठी निगुतीनं ठेवून देतो. सासरी शाडुचीच छोटी मूर्ती असते. सोहळा पार पडल्यावर घरालगतच पाणी साठवण्याची जागा आहे. तिथे ती विसर्जित करतो.

सुरुवातीला माझ्या माहेरी गणपती बसवण्याची पद्धत नव्हती. ती कशी सुरु झाली याचीही एक गोष्ट आहे. लहान असताना वडिलांनी दहा पैशाचं नाणं गिळलं होतं. ते कळल्यावर सगळ्यांचीच घाबरगुंडी उडाली. ते आतड्यात असं काही रुतलं की ऑपरेशनशिवाय पर्याय नाही असं डॉक्टराचं मत होतं. त्या काळी साध्या इंजेक्शनलाही घाबरणारी माणसं ऑपरेशनच्या धसक्यानं गर्भगळीत झाली. आजीनं देव पाण्यात घातले आणि मुलाला वाचव, मी गणपती बसवणं सुरु करेन असा नवस बोलला. आश्चर्य म्हणजे पुढच्या दहा मिनिटातच नाणं बाहेर पडलं. तेव्हापासून घरात गणपती बसवणं सुरु झालं.

मला एक गणेशोत्सव नेहमीच आठवतो. तेव्हा गणेश चतुर्थीलाच टीव्हीवर आई रेसिपी दाखवणार होती. त्यासाठी घरी न्यूज चॅनेलवाले आले होते. एकीकडे ओट्यावर ती गडबड, दुसरीकडे घरात गणपती बसलाय ती गडबड, शुटींग बघण्यासाठी शेजाऱ्यांची गडबड. ती सर्व गडबड आजही हमखास आठवते. गणेशोत्सवात त्याच्या बदललेल्या रुपाची, त्यात आलेल्या भडकपणाची, पैशाच्या अपव्ययाची नेहमीच चर्चा होते. पण मला व्यक्तिश: यात फारसं काही वेगळं वाटत नाही. कारण आपल्या संस्कृतीतच भव्यतेला महत्व आहे. कुठलीही गोष्ट भव्यदिव्य करण्याकडेच आपला कल असतो. दिमाख आपल्याला आवडतो. एरवी वर्षभर माणसं आपापल्या व्यापात व्यस्त असतातच. या निमित्तानं ती एकत्र येतात, मन मोकळं करतात, मौजमजा करतात. तेव्हा त्यांना एवढी मोकळीक द्यायला हवी. माझ्या मते हा उत्सव माणसांनी व्यक्त होण्याचं एक माध्यम आहे.

# पेहराव देवदानवांचा

गणेश अंतरंग

अलिकडे 'ते' १३ फूट उंचीच्या विठ्ठलाचे आणि १५ फुटांच्या बकासुराचे कपडे शिवण्यात मग्न होते. देव आणि दानवांबरोबरच विविध प्राण्यांसाठी कपडे तयार करण्याचे काम ते करतात. या कल्पक कारागिराचे नाव सोमनाथ मगर. गणेशोत्सव जवळ आला की श्री. मगर यांची घाई-गडबड सुरू होते. गेली ३५ वर्षे ते आराशीच्या मूर्तीचे कपडे शिवण्याचे काम करतात. आतापर्यंत त्यांनी १७ हजारहून अधिक मूर्तीचे कपडे शिवले आहेत. आराशीचा विषय ऐतिहासिक असो, पौराणिक असो वा सामाजिक, सर्व प्रकारच्या म ूर्तीचे कपडे श्री. मगर शिवतात. गणेशोत्सवाच्या आधी दीड- दोन महिने त्यांच्या कामाला सुरुवात होते.

मंडळाचे कार्यकर्ते त्यांच्याशी संपर्क साधून आराशीचा विषय सांगतात. मूर्तीची कल्पना देतात. मूर्ती ऐतिहासिक, पौराणिक देखाव्यातील असतील तर मगर जुन्या 'चांदोबा'तील चित्रे बघून, कधी इतिहासाची पुस्तके चाळून संबंधित मूर्तीची वेशभूषा व केशभूषा निश्चित करतात.

पोषाखाला लागणारे कापड ते मोठ्या शहरांमधून खरेदी करतात. कपड्यांवरचे जरीकाम, जर्दोसीकामही ते करतात. काही मूर्तींना चिलखताची गरज असेल तर तेही श्री. मगर तयार करतात. त्यासाठी चामडे वापरले जाते. या व्यतिरिक्त फर, फोमही वापरले जाते. शेळी, वाघ, लांडगा, अस्वल, गाढव आदी ६० प्राण्यांच्या मूत- ींचे कपडे त्यांनी शिवले आहेत. प्राण्यांचे कपडे म्हणजे त्यांची त्वचा असते. अशा वेळी त्या रंगाची फर मि ळवण्यासाठी अनेक दुकाने पालथी घाल- ावी लागतात. प्राण्यांचे कपडे शिवणे आव्ह- ानात्मक असते. विविध व्यक्तिरेखांसाठी लागणारे टोप, टोप्या, जिरेटोप, गंगावन, फेटे श्री. मगर इतर ठिकाणाहून खरेदी करून मंडळाच्या कार्यकर्त्यांना देतात.

महागाई वाढल्याने कपड्यांच्या शिलाईमध्येही वाढ झाली आहे. यंदा हे दर ५० टक्क्यांनी वाढले आहेत. काही वेळा मंडळाचे कार्यकर्ते कापड, दोरा, जरीवर्कचे सामान आणून देतात. अशा वेळी श्री. मगर एका मूर्तीच्या कपड्याच्या शिलाईचे व फिटिंगचे २०० ते ५०० रुपये घेतात. हा दर मूर्तीच्या आकारावरही अवलंबून असतो. आता गणेशोत्सवाचा जल्लोष सुरू आहे. सर्वजण देखाव्यांची आणि मंडळांच्या मेहनतीची चर्चा करत आहेत. पण या गदारोळात देखाव्यांना, त्यातील पात्रांना उठाव देणाऱ्या या कलाकारांचीही आठवण ठेवायला हवी.



# जात आणि धर्माचे खेळ कधी थांबतील?



कुठल्याही हुकुमशाही राजवटीला आपल्या जनतेला भुलवायला आणि पाठिंबा द्यायला एक शत्रु दाखवावा लागतो. आपल्या वाईटाला, आपला सुवर्णकाळ मातीत जायला हा शत्रूच कारणीभूत आहे, अशी ठाम समजूत करून दिली जाते. भारतात जे काही वाईट घडलेलं आहे, त्याला मुस्लीम जबाबदार आहेत आणि हा देश सोनेकी चिडिया होता. त्याची बरबादी व्हायला इस्लाम कारणीभूत आहे हे आपल्याला पटवून दिलेलं आहे. आता आधुनिक काळात या प्रचाराची पुढची पातळी भारतातल्या मुस्लिमांची संख्या वाढून हिंदू खतरेमे येतील ही लोणकढी थाप मारली जाते. सांख्यिकी आकडेवारीने या दाव्यातला फोलपणा कळून येईलही. मुळात भारतातल्या हिंदुनी तत्कालीन काळात इस्लाम का स्विकारला हा कळीचा मुद्दा उरतोच. धर्मांतर दोन प्रकारे होत होत. एक म्हणजे तलवारीच्या धाकाने आणि दुसरे लाभांच्या, अधिकारांच्या, सवलतींच्या अपेक्षेने. तलवारीच्या धाकाने धर्मांतर झालं अस म्हणावं तर ही इस्लाम मध्ये गेलेली मंडळी पुन्हा पवित्र वगैरे करून हिंदू धर्मात आणण्याची सोय नव्हती का ? अशी 'इनकमिंगची' सोय सोपी सुटसुटीत असती तर अनुकूल काळ आल्यावर ही मंडळी पुन्हा हिंदू होऊ शकत होती. अशी सोय उपलब्ध होती का? हिंदू धर्माने माणसांना आपल्या धर्मात येण्याची प्रक्रिया क्लिष्ट केलेली होती, म्हणून इच्छा असूनही लोक माघारी येऊ शकले नाहीत हे सत्य नाकारता येईल का? सन्मानाच्या, लाभांच्या, अधिकारपदांच्या, सवलती मिळतील, रोजगार मिळतील या अपेक्षेने स्वेच्छेने इस्लाम स्विकारलेली जनता साहजिकच भौतिक सुखांपुढे धर्म गौण मानणारी होती. म्हणूनच धर्म सोडून गेली किंवा त्यांच्या धर्मविषयक जाणीव, धर्माबद्दल असलेली आस्था आणि आपुलकी अतिशय विसविशीत होती, कमकुवत होती हाच निष्कर्ष निघतो ना? मुळात हिंदू धर्मात असलेली असमानता केवळ जन्माने तुम्ही कुठल्या जातीत, वर्णात जन्मलेले आहात त्यानुसार तुम्हाला समाजात मिळणारा सन्मान, तुमच स्थान ठरवणार असेल तर साहजिकच अस अपमानित करणारा धर्म कुणाला आपलासा वाटणार आहे? मग ज्याच्या विषयी आपलेपणाची भावना नाही तो धर्म कवटाळून बसण्यात अर्थ तरी काय आहे? असं जर कुणी म्हटलं तर तो नक्कीच देशद्रोहींच्या यादीत गणला जाईल!

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

हिंदू धर्मात असलेल्या त्रुटी दूर केल्या, तिथे समानता आली, सगळ्यांना समान हक्क मिळाले तर कोण कशाला धर्म सोडून जाईल, ही साधी बाब आपल्याला कळत नाही आणि आपण हिंदुनी धर्म सोडला हेच तथ्य इस्लामने धर्मांतर घडवून आणले अस उलट पद्धतीने मांडून खापर फोडतो.

हिंदू धमार्तून धर्म त्यागून इतर धर्म स्विकारणे थांबवण्यासाठी हिंदू धर्मातल्या खालच्या वगार्ला सन्मानाने वागवण्याची गरज आहे हे विधानच मुळात गंडलेल आहे. हिंदू धर्मात हा वरचा तो खालचा या उतरंडी नष्ट केल्या आणि सगळे एकाच पातळीवर समान झाले, समानता हा हिंदू धर्माचा गाभा झाला तर कुणाला सन्मानाने वागवण्याची गरजच भासणार नाही ना?

कुणाला तरी सन्मानाने वागवण्याची गरज आहे अस आपण म्हणतो, त्यावेळी आपण वरच्या पायरीवर आहोत आणि कुणीतरी खालच्या पायरीवर आहे हे गृहीतक मान्य करतो ना? हिंदू धर्म चांगला, निर्दोष, श्रेष्ठ असेल तर त्यातून बाहेर पडून जैन, बौद्ध, लिंगायत, शीख धर्म का स्थापन झाले?

दुसरी बाब आणि कळीचा मुद्दा म्हणजे हिंदू खतरेमे है आणि हिंदू धर्मातून इतर धर्मात जाणाऱ्या लोकांना माघारी आणलं पाहिजे किंवा थोपवल पाहिजे, अस जे म्हणतात त्यांना बेसिक प्रश्न विचारावासा वाटतो, तो असा की, समजा हिंदू धर्मातून कधीकाळी एखाद्याचे आजे पणजे मुसलमान झाले असतील आणि आता त्यांना पुन्हा हिंदू होण्यासाठी तुम्ही तयार असलात तरी त्यांना परत हिंदू होऊन मिळणारी जात कोणती असेल? त्यांना त्यांची पूर्वीची जात मिळेल की प्रमोशन होऊन नवी जात मिळेल?

हा प्रश्न विचारला की हा धर्म धर्म खेळणारी मंडळी थातुरमातुर उत्तर देऊन वेळ मारून नेतात. या सगळ्या गोष्टींचं सार फार सोप आहे. हिंदू धर्माच्या उतरंडीत वरच्या वर्गात असलेल्या लोकांना खालच्या पायरीवर असणारी लोक फक्त आपले गुलाम आणि सोल्जर्स किंवा सेवेकरी म्हणून हवे आहेत.

'हिंदू खतरेमे है' च्या नावाखाली दंगलीत राडे करायला, गोरक्षक म्हणून केसेस अंगावर घ्यायला, प्रत्येक ठिकाणी हाणामारी करायला हे सोल्जर्स हवे आहेत. मात्र या सोल्जर्सला समानतेने वागवण्याची आमची तयारी नाहीये. तुम्ही तुमच्या जन्मदत्त जातीनुसार तुमच्या पायरीनेच राहील पाहिजे आणि तुम्ही वैदिकांच्या पालखीचे भोई म्हणूनच जगल पाहिजे एवढाच सोपा अर्थ.

ही समानता जोवर हिंदू धर्म स्विकारत नाही, तोवर 'हिंदू खतरेमे है' या भंपकपणाला काहीही अर्थ नाही. अलिकडच्या काळातील काही उदाहरणं डोळ्यासमोर आहेत. कोल्हापूर, नाशिक, यवत, विशाळगड, सांगली किंवा आणखी तत्सम कोणत्याही गावात दंगली झाल्यावर ज्यांच्या अंगावर खटले पडलेत, ज्यांना जामिनासाठी आईबापाला खेटे घालून डाग मोडावे लागलेत, ज्यांना सणवार आला की पोलीस स्टेशनात हजेरी द्यावी लागतीय, अश्या सगळ्या तथाकथित धर्मरक्षक बहुजनांनी काही गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे.

धर्म रक्षणासाठी ज्यांचा आदेश येताच बहुजनांचे तरुण रस्त्यावर येतात आणि बरबाद होतात, त्यांनी आपल्या आजूबाजूला नेमके काय चालले आहे याचा अभ्यास केला पाहिजे. पण तो अभ्यास न करता धर्म संकटात सापडल्याचे समजून तो जी कृती करतो, ती त्याला आयुष्यभर पश्चाताप करायला लावते. परंतु तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

बीसीसीआयच्या माध्यमातून अमित शहांचा मुलगा विविध देशांमध्ये हजेरी लावतो, त्यावेळी आपले अनेक तरुण धर्मरक्षणासाठी लढाई करीत असतात. जरा बारकाईने आजूबाजूला नजर टाकल्यावर या तरुणांची झोप उडाली तर ठीक, अन्यथा जे काही चालू आहे ते चालूच राहील. शिवराज सिंह चौहान उर्फ मामाजींचा मुलगा कार्तिकेयने अमेरिकेच्या पेनसिल्वेनिया यूनिवर्सिटीतून एलएलएम पदवी संपादन केली. त्यामुळे त्याच्या जीवनाची पुढची वाटचाल सांगायला ज्योतिषाची गरज नाही.

केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांचा मुलगा ब्रिटनच्या लीडस् युनिव्हर्सिटी मधून एमबीए करीत आहे. ही व्यावसायिक पदवी एकदा मिळाली की त्याच्या करिअरची कुठलीही चिंता राजनाथ सिंह यांना राहणार नाही. महाराष्ट्राचे म्हणावे की गुजरातचे म्हणावे याबाबत मतभेद असले तरी केंद्रीय मंत्री पियूष गोयलची मुलगी आणि मुलगा हॉवर्डमध्ये शिकून इनव्हेस्टमेंट बँकर बनली आहेत.

रविशंकर प्रसाद यांचा मुलगा आदित्य शंकर अमेरिकेतील न्यूयॉर्कच्या कॉर्नेल यूनिवर्सिटीमधून कायद्याचं शिक्षण घेऊन वकिली करतोय. पण दंगलीत सहभागी झालेल्या तरुणांचे वकीलपत्र तो फुकट कशाला घेईल? निर्मला सीतारामनची मुलगी वांग्मयी अमेरिकेच्या नॉर्थवेस्टर्न यूनिवर्सिटीमधून मास्टर्स झाली.

एस. जयशंकरचा मुलगा ध्रुव अमेरिकेच्या जॉर्जटाउन यूनिवर्सिटी मधून मास्टर्स, आणि मुलगी मेधा डेनिसन युनिव्हर्सिटी मधून स्नातक आहे. ज्योतिरादित्य सिंधियांचा मुलगा महाआर्यमन येल युनिव्हर्सिटीमध्ये शिकला. हर्षवर्धनचा मुलगा सचिन मेलबर्न युनिव्हर्सिटीत फायनान्स आणि अकाउंट्स विषयात उच्च शिक्षण घेतोय. जितेंद्र सिंहचा मुलगा अरुणोदय ऑक्सफर्ड मधे शिकतोय. अनिल बोंडेंचा मुलगा अमेरिकेत डॉक्टर होऊन तिकडेच आंतरजातीय लग्न करून स्थायिक झालाय.

यादी बरीच मोठी आहे. जहाल हिंदुत्वाचे पुरस्कर्ते व नथुराम गोडसे फेम शरद पोंक्षेची कन्या कुठे काय करते हेदेखील महाराष्ट्राला माहित आहे व ते अलीकडच्या काळातील सर्वात ताजं उदाहरण आहे. तुमची लेकरं काय करत आहेत? हिंदु, मुस्लिम, दलीत, दंगे, जाळपोळ, कोर्टाच्या तारखा आदींमध्ये व्यस्त आहेत. मग कशाला गळे काढायचे आम्हाला वापरून घेतलं म्हणून ?

### संपवला मराठी माणूस या राजकारण्यांनी?

'मी मुंबईकर' मराठी आहे, याचा आपल्याला अभिमान जरूर आहे. पण? मी आजारी पडलो तर माझी पसंती रिलायन्स हॉस्पिटलला आहे, ते गुजरात्याचं आहे. माझं आवडतं हॉटेल ताज आहे. ते पारशी माणसाचं आहे. मी 'टाइम्स ऑफ इंडिया' वाचतो जो जैन या मारवाड्याचा आहे. लोकसत्ता गोएंका शेठचा आहे. लोकमत दर्डा नावाच्या मारवाड्याचा आहे. मी झी मराठी पाहतो, तो सुभाषचंद्र या सिंध्याचा आहे. मला न्यूज १८ लोकमत आवडतं, ते गुजरात्याचं आहे. माझ्या खिशातला मोबाईल जीओचा म्हणजेच गुजरात्याचा आहे. मी घर शाह नावाच्या बिल्डरकडून घेतलंय, जो मारवाडी आहे. मी ज्याच्या रिक्षाने स्टेशनवर जातो, ती शर्मा नावाच्या भैयाची आहे. मी जिथे चहा पितो तो ठेला अण्णा नावाच्या तामिळीचा आहे. ज्या मेट्रोने फिरतो ती गुजरात्यांच्या पैशाची आहे. वीज अदानी आणि टाटांची आहे. विमानं पारशी माणसाचं आहे. काम करतो त्या कंपनीचा मालक पंजाबी आहे. इडली खातो तो कामत उडपी आहे. संध्याकाळी दोन पेग मारतो ते हॉटेल शेट्टी माणसाचं आहे. बेकरीवाला अय्यंगार, दूधवाला मारवाडी, फर्निचरवाला मारवाडी, किराणावाला मारवाडी, कपडेवाला सिंधी, चिकनवाला उत्तर भारतीय आहे. फक्त मी ज्या भिकार राजकारणाच्या गप्पा हाणतो, ते राजकारणी तेवढे मराठी आहेत. संपवला मराठी माणूस या राजकारण्यांनी आणि स्वतःच्या मी पणातच संपला. कटू आहे पण सत्य आहे.

# तीन तिघाडा..!



रायगडमधली सगळी कामं आटवून मी सिद्धार्थ जाधव नावाच्या माज्या कॉलेज मित्राच्या घरी जेवण केलं. मुंबईमधल्या माणसाला कोणाच्या घरी जाऊन जेवायचं म्हटलं की जरा अडखळल्यासारखं वाटतंच. आणि ते जेवण जर एखाद्या गावच्या ठेवणीत आईच्या स्पशार्ने बनवलं असेल, तर त्याची मजा काही औरच. सिद्धार्थ आणि मी तसे नांदेड जिल्ह्यातले. त्याच्या आईची जुनी ओळख, मग काय – आईने पक्का मराठवाडी जेवणाचा बेत आखला आणि जोरदार जेवण झाले.

जेवण झाल्यावर मी पुढच्या रस्त्याला निघालो. गाडी सुरू होती. मी माज्या लॅपटॉपवर माझीच प्रेमसेतू नावाची कादंबरी वाचत होतो. बराच वेळ प्रवास झाल्यावर फणसाड अभयारण्य असा बोर्ड वाचायला मिळाला. पुढे मुरुड-जंजिरा आणि रोहे अशी शहरे आसपास असल्याचं फलकावरून जाणवलं. त्या रस्त्यावर मध्ये येणारी माणसं – जंगलातून रस्त्यावर प्रवास करणारी माणसं; कोणी फळं विकत होतं, कोणी लाकडं वाहत होतं, कुणी गुरेढोरे चारण्यासाठी जंगलामध्ये ये-जा करत होतं.

जंगलाच्या आतमध्ये थोडं पुढे गेल्यावर माणसांची वर्दळ जरा कमी झाली. एका वाहणाऱ्या शांत आणि निरागस झऱ्यावर माझी नजर गेली. तिथे प्रचंड शांतता होती. आसपास असणारं वातावरण मनाला मोहिनी घालत होतं. मी सगळीकडे पाहिलं, आसपास कोणीही नव्हतं. कदाचित म्हणूनच इथल्या वातावरणामध्ये एक वेगळी शांतता होती.

माझ्यासोबत असलेला शंकर नावाचा माझा चालक मला म्हणाला, साहेब, तुम्ही त्या झऱ्याकडे पाहत आहात; पण त्याच्या थोडं पलीकडे पहा. मी पाहिलं तर एका बाजूला दोन-चार मोर एका झाडाखाली बागडत होते. त्या मोरांच्या पलीकडे, दोन छोटे-छोटे हरणाची पिल्लं पाणी पिण्यासाठी पाऊलवाटेने पाण्याच्या दिशेने जात होती. आम्ही गाडीचा आवाज न करता शांतपणे तिथेच थांबलो होतो.

असं वाटत होतं की माणसाने त्या सगळ्या प्राण्यांच्या विश्वावर प्रचंड अतिक्रमण केलं आहे. बिचाऱ्या प्राण्यांना माणसाने कुठेच सोडलेलं नाही.

माझ्या चालकाने मानेखालची शीट लांब केली आणि त्या लिंबाच्या झाडाखाली रस्त्यावर शांतपणे त्या शीटवर पडला.

सिद्धार्थच्या आईचं जेवण त्याच्या अंगाला लागलं होतं, हे माझ्या लक्षात आलं. मी लॅपटॉप आवरला आणि चालकाला आवाज देत म्हणालो, ह्अरे, मी जरा आलोच.ह्व ड्रायव्हरने लावलेले डोळे थोडेसे उघडले आणि माज्याकडे पाहिलं. मी गेल्याची खात्री करून तो अजून शांततेत पडून राहिला.

मला दुरून दिसणाऱ्या त्या झऱ्यापर्यंत मी चालत गेलो. मी जाईपर्यंत त्या हरणांचं पाणी पिणं झालं होतं. माज्या पावलांच्या चाहुलीने ते मोर केव्हाच पळाले होते. आता मी तिथली शांतता आणि ते पाण्याचे वाहणारे झरे – अशा आमच्यातच न बोलताही गप्पा सुरू होत्या. मी बूट काढले आणि शांतपणे त्या पाण्यात पाय सोडून बसलो.

त्या जागेवर खऱ्या अर्थाने सांगायचं तर शांत जगाची चाहूल लागली होती – म्हणजे माणसं नाहीत, वाहनांची जवळजवळ ये-जा नाही, मोबाईलला रेंज नाही, कोणाचं बंधन नाही, कुठल्या फॅक्टरीचा किंवा विमानाचा आवाज नाही.

मला असं वाटलं होतं की थोडा वेळ झाल्यावर माझा चालक मला शोधत-शोधत तिकडे येईल आणि म्हणेल, ह्चला, उशीर झाला; पण तो कशाचा येतोय! शांत ठिकाणी आणि लिंबाच्या झाडाखाली त्याला लागलेली झोप अधिकच गाढ स्वरूपाची होती, हे त्याच्या न येण्यामुळे मी समजून गेलो.

पुढच्या प्रवासाला लागावं, या हेतूने मी उठणार तितक्यात दोन महिला आणि एक मुलगी डोक्यावर लाकडांच्या मोठ्या मुळ्या घेऊन येताना मी पाहिल्या. त्या तिन्ही माझ्या अगदी जवळ आल्या.

त्यांनी अलगदपणे त्या लाकडाच्या मुळ्या खाली ठेवल्या आणि मी ज्या ठिकाणी पाय सोडून बसलो होतो त्या झऱ्याचं पाणी गटागट पिऊ लागल्या. पाणी प्यायल्यावर त्यांचा थकलेला चेहरा एकदम प्रसन्न झाला.

त्या सुनसान जागी, जिथे सगळीकडे सावधान असे बोर्ड लावलेले होते, जिथे माणसांचा-पक्ष्यांचा फारसा थारा नव्हता, तिथे या दोन महिला आणि एक मुलगी एवढ्या जड लाकडं घेऊन कुठे जात असतील? हे रोजचं त्यांचं काम असेल का? यांना इथल्या हिंस्र प्राण्यांची भीती वाटत नसेल का? असे प्रश्न माझ्या मनात आले.

मी त्यांना बोलावं का, आणि बोलल्यावर त्यांना आवडेल का, हा प्रश्नही मनात आला. पण मी संकोच न ठेवता मोठ्याने आवाज दिला... ताई, हे पाणी काय पाईपलाईनचं आहे का?

मी ज्यांना प्रश्न विचारला, त्या बाईने दुसऱ्या बाईच्या चेहऱ्याकडे पाहिलं, पदरानं चेहरा पुसला आणि हसत म्हणाली, दादा, हे जंगलातून येणारं पाणी आहे. इथे कुठली पाईपलाईन आली आहे? मी विचारलं, बारा महिने पाणी असतं का? ती म्हणाली, हो, इथे नेहमी पाणी असतं.

मी विचारलं, तुम्ही कुठे राहता? हे ऐकल्यावर तिचा सूर थोडा आवरलेला झाला, बाजूलाच राहतो, एवढंच उत्तर दिलं. मी म्हणालो, बरं ताई, ठीक आहे, मी निघतो. त्यावर ती म्हणाली, दादा, जरासा हात लावाल का, ही लाकडं उचलायला?

मी हसलो, हो का नाही, नक्की.

पण तिनं लगेच म्हटलं, असू द्या, दादा. आम्ही थोडं खातो, थोडा वेळ बसतो, मग निघतो. मी हो म्हणून मान हलवली. तिने पिशवीतून भाकरी काढली. त्या खात होत्या. त्या दोन मोठ्या महिलांना मला बोलायला संकोच वाटत होता, पण धाकटी मुलगी मोकळेपणाने बोलत होती.

ती म्हणाली, दादा, तुम्ही आमच्या सरांसारखे दिसता. तुम्ही पण शिक्षक आहात का?

मी हसत उत्तर दिलं, नाही, मी पुस्तकं लिहितो, लेखक आहे. ती म्हणाली, थोडं खाल का भाकरी? मी म्हणालो, नको, मी आत्ताच जेवलो. ते ऐकून दुसरी महिला म्हणाली, अगं, एवढे मोठे माणसं आहेत, तुझा चटणी-भाकरीचा तुकडा खातील का?

हे ऐकून मुलीचा चेहरा पडला.

---------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

भ्रमंती लाईव्ह स्टोरी



संदीप काळे
sandip98868@gmail.com
9890098868

# उत्सवांना विधायक वळण द्या..







लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ज्या हेतूने गणेशोत्सव, शिवजयंती असे उत्सव सुरू केले त्याच्यामागे फार मोठी भूमिका होती आणि विचार होता. काळानुसार उत्सवाचे स्वरूप बदलले हे मात्र नक्की. कार्यक्रमातून उत्सवामधून जे काही फलित व्हायला हवे ते होत नाही.

अनेक ठिकाणी गणेशोत्सवात रस्त्यामधून मंडप टाकले जातात वाहतुकीला अडथळ्याचे ठरतात. उत्सवाची वर्गणी मागण्यासाठी बऱ्याच वेळा जबरदस्ती केली जाते मिरवणुकीमध्ये डीजेचा डॉल्बीचा लेझर किरणांचा वापर केला जातो आरोग्य दृष्टीने ते घातक असते. आंधळेपणा, बहिरेपणा, उच्चदाब असणाऱ्यांना बऱ्याच वेळा धोका झालेला आहे . काही प्रकरणात तर मृत्यू ओढवलेला आहे.



मिरवणुकीमध्ये बऱ्याच ठिकाणी मद्यपान करून दिवसभर अर्थहीन गाण्यावर नाच केला जातो, सर्वच ठिकाणी सारखी परिस्थिती असते असे नाही. काही मंडळांमध्ये अतिशय शिस्तबद्ध पणे आरती केली जाते आणि कार्यक्रमाची आखणी केली जात असते. परंतु अशा मंडळांची संख्या फारच कमी असते. हे प्रमाण ८०/ २०% असे असते अनेक ठिकाणी चांगल्या कार्यक्रमाचे आयोजनही केलेले असते.

गेल्या काही वर्षांमध्ये अशा उत्सवामध्ये राजकारणी नेत्यांचा प्रवेश झाल्यामुळे उत्सवाचे स्वरूपच पालटले आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात देणग्या मिळतात त्यामुळे वेगळ्या प्रकाराने कार्यक्रमाचे आयोजन होते. त्यात त्यांचाही सहभाग असतो. त्यामुळे अशा कार्यक्रमा नियमाचे बंधन पाळले जात नाही आणि अधिकारी असहाय्य असतात.

होणाऱ्या त्रासामुळे मात्र बऱ्याच वेळा जनता नाराज असते. आणि म्हणूनच मग उद्विग्न अवस्थेतून संतापाने बंद करा हा गणेशोत्सव अशा प्रतिक्रिया काही जणांकडून उमटतात. अर्थातच असे आपले धार्मिक उत्सव बंद होणे शक्य नाहीच फक्त त्यात काही सुधारणा आणि विधायक कार्य होणे अपेक्षित आहे.

गणेशोत्सव म्हणजे आनंद आणि चैतन्याचा उत्सव असतो आणि उत्साह ही असतो. गणपतीला विद्येची देवता, चौसष्ट कलांचा अधिपती आणि विघ्नहर्ता, संकट विमोचक म्हणतात. आपण कुठल्याही कार्याची सुरुवात करताना श्री गणपतीचे पूजन करतो आपले कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी प्रार्थना श्री गणपती समोर करतो.

*गणपती माझा नाचत आला,*
*गणपती बाप्पा आले घरा,*
*घराचे मंदिर झाले.. बघा....*

असे म्हणत आपण घरोघरी शोडपचारे पूजा करून गणपतीची स्थापना करीत असतो. मोदकांचा नैवेद्य दाखवत असतो.



दिलीप देशपांडे
जामनेर. जि.जळगांव.
८९९९५६६९१७
dilipdeshpande24
@gmail.com

महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सुरुवात पेशव्यांचे काळात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थी पासून दशमी पर्यंत सात दिवस हा उत्सव होत होता. गणेश उत्सवाला सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप १८९३ सालापासून मिळाले. त्यावेळी लोक जागृतीचे एक मुख्य साधन म्हणून प्रबोधनाचे स्वरूप दिले.

लोकमान्य टिळकांनी समाजात एक्याची भावना वाढावी या हेतूने गणेशोत्सवाची त्यासाठी निवड केली आणि त्यावेळी हा उत्सव गणेश चतुर्थी पासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत असा दहा दिवस सुरू करण्यात आला. त्यावेळच्या परिस्थितीत सर्व समाजाला एकत्र करावे आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी हा त्यामागचा मोठा उद्देश होता. अर्थातच स्वातंत्र्य आंदोलनात सार्वजनिक गणेशोत्सवात जे लोक जागृती कार्य केले ते उल्लेखनीय आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात पुण्यात झाली आणि हळूहळू तो संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होऊ लागला. राजकीय व्यक्तिंच्या प्रवेशामुळे, पाठबळामुळे उत्सवांना वेगळे स्वरूप प्राप्त होत आहे हे सत्य नाकारता येणार नाही. कारण राजकीय व्यक्तींकडून आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी अशा मंडळांना मोठ्या मोठ्या देणग्या देऊन आकृष्ट केले जाते. परिणामी हा पैसा योग्य कामी खर्च न होता फक्त डी. जे, रोशणाई, मोठ मोठ्या मूर्ती आणि इतर अनेक कारणासाठी खर्च होतो,

फार कमी मंडळाकडून विधायक कामे होतात. गणेश मंडळात असणारी बहुसंख्य मंडळी ही तरुणच असते आणि अशावेळी त्या मंडळाकडून होणाऱ्या कार्यक्रमाला विधायक स्वरूप कसे प्राप्त होईल, सामाजिक ऐक्य कसे टिकून राहील, पर्यावरणाचा विचार कसा केला जाईल किंवा प्रदूषण निर्माण होणार नाही याची दखल घ्यायला हवी.

उत्सवात पूजेसाठी मातीची मूर्ती असावी असे उल्लेख आहेत. आणि संकल्पात सुद्धा

*मृण्मय पार्थिव महागणपती पूजनं करिष्ये..*

असे म्हणण्याचा प्रघात आहे .कारण कर्मकांडातील बहुतेक पूजा ह्या विशेष कालावधीनंतर विसर्जित केल्या जात असतात, म्हणूनच घरात आणली जाणारी गणपतीची मूर्ती ही आपल्याला स्वतःला आणता येईल एवढे असावी, अनेक ठिकाणी महापालिकांनी पी.ओ.पी. गणेश मूर्तीवर बंदी आणलेली आहे. प्रदूषण महामंडळा कडून त्याविषयी आदेश काढले जातात.

गणेशोत्सव हा तर महाराष्ट्रातला सगळ्यांचा आवडता आणि मोठा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.

सध्याच्या परिस्थितीत ह्या उत्सवाचे स्वरूप खूप बदलले आहे. धार्मिकते पेक्षा ईतर गोष्टींना महत्व दिले जाते. मोठया मूर्ती, देखावे झगमगाट, रोषणाई, डी. जे. च्या तालावर कर्कष्य गाणी, हे प्रमाण वाढले आहे. बाजारात सिंगल यूज प्लास्टिक मध्ये सजावटीच्या प्लास्टिकच्या फुलांचा समावेश नसल्याने बाजारपेठेत सर्रास विकले जातात.

लोकमान्य टिळकांनी ज्या विचारांनी घरातल्या गणपती बरोबरीने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात केली, त्याचा जवळपास विसर पडल्या सारखा झाला आहे. अगदीच तुरळक मंडळात गणपती अथर्वशीर्षाचे पठण होते. पुण्यामध्ये हजारोंच्या संख्येने महिला ऋषिपंचमीला दगडूशेठ गणपती समोर अथर्वशीर्षाचे पठण करतात. काही ठिकाणी अथर्वशीर्ष पठणाच्या स्पर्धा घेतल्या जातात.

काही वषार्पूर्वी गणेश व्याख्यानमाला सारखे उपक्रम केले जात होते. निरनिराळ्या विषयावरचे विचार ऐकायला मिळायचे. देखावे, रोषणाई, तर करावीच पण ह्या गोष्टीलाही प्राधान्य होते. आता काही ठराविक ठिकाणीच असे व्याख्यानमालाचे कार्यक्रम आयोजित केले जातात अथर्वशीर्ष पठण स्पर्धा घेतल्या जातात.

डी. जे. च्या कर्कष्य तालावर जी गाणी लावली जातात,तो प्रकार कुठेतरी थांबावा असे वाटते. उत्सव साजरा करण्यातूनच आनंद, समाधान, जरुर मिळायला हवे पण त्यापासून कोणाला त्रास होणार नाही हा विचारही असायला हवा. म्हणूनच हा उत्सव साजरा केला जातो उत्सवा मागचे खरे धार्मिक, सांस्कृतिक, प्रबोधन महत्वाचे विषयांचा, उद्देशाचाही विसर पडायला नको.

उत्सव साजरा करताना जर आपण काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्या उत्सवाचे हेतू आणि पावित्र कायम राहील .गणेश मूर्ती निवडताना ती शाडूच्या मातीची किंवा इको फ्रेंडली असावी. प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा थर्मोकोलची नसावी. मूर्तीची उंची प्रमाणात असावी.

उत्सवात आकर्षक पण कमी वीज लागणारी रोषणाई केली तर विजेची बचतही होते.

आरास करतानाही ती पर्यावरण पूरक तसेच आरोग्यासाठी हानिकारक ठरणार नाही असेच रंग वापरावे.

सरकारने बंदी आणलेल्या प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

उत्सवाचे काळात आपल्या उत्साहामुळे म्हणजेच डी. जे लाउड स्पीकर याच्या वापरामुळे आजूबाजूच्या परिसरातील दवाखाने, शाळा, यांना त्रास होणार नाही हे बघायला हवे. रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही ही काळजी हवी.

मूर्ती विसर्जनाच्या वेळी ठीक ठिकाणी तातुरते तळे किंवा तलाव त्या त्या ग्रामपंचायत नगरपालिका यांनी उपलब्ध करून द्यावे.

अपप्रकार घडणार नाही अपप्रवृत्तीचा शिरकाव होणार नाही याची काळजी मंडळाचे कार्यकर्त्यांनी घ्यावी.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या सार्वजनिकतेत जो सांस्कृतिक वैभवचा ठेवा दिला आहे त्या निमित्ताने या उत्सवात सर्वांनी एकत्र यावे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे व्हावे, स्पर्धा व्हाव्यात एकमेकात बंधूभाव, देशप्रेम निर्माण व्हावे आणि गणेशोत्सवाचे पावित्र्य कायम ठेवून लोकसंस्कार व्हावे तरच गणेशोत्सव साजरा करण्याचा हेतू साध्य होईल.

सगळे सण, उत्सव साजरे करत असताना सामाजिक भान ठेवायला हवे. आपल्या संस्कृतीला शोभेल असेच धार्मिक आणि विधायक कार्यक्रम आखून उत्सव साजरे व्हावेत.

अशा प्रकारचे उत्सव, सण, हा सर्व आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे. ठिकठिकाणी गणपती मंडळांनी या गोष्टीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आता शासनाने गणेशोत्सवाला राज्याचा उत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. त्या दृष्टीने त्यांनी आखून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. राजकीय नेत्यांचा कार्यक्रमास सहभाग असला तरी त्यामुळे कार्यक्रमाचे स्वरूप बिघडणार नाही याची दक्षता घ्यायला हवी.

राज्य उत्सव म्हणून जिल्ह्या जिल्ह्यात उत्कृष्ट विधायक कार्य करणाऱ्या, देखावे सादर करणाऱ्या, आणि नियमांचे पालन करणाऱ्या मंडळांना बक्षिसे जाहीर करून त्यांचा सत्कार करावा त्या निमित्ताने उत्कृष्ट कार्य करण्याची मंडळांमध्ये चढाओढ लागून मंडळाच्या कामात शिस्त निर्माण होईल. अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

***मोरया.. मोरया.. बोला गणपती बाप्पा मोरया..***

# ‘एक पेड माँ के नाम’ या देखाव्याने सामाजिक संदेश

## शहीद भगतसिंग क्रांतिदल मंडळाचा ५९ वा गणेशोत्सव

**नाशिक ।** हिंदू एकता आंदोलन पक्ष प्रणित शहीद भगतसिंग क्रांतिदल मंडळ, पाचरस्ता, नाशिक हे गेली तब्बल ५९ वर्षे सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रप्रेमाची परंपरा जोपासत आहे. सन १९६६ मध्ये स्वर्गीय तुळशीराम बावरी व स्वर्गीय जगु वस्ताद गायकवाड यांनी या मंडळाची स्थापना केली. त्याकाळी उपेक्षित मानल्या जाणाऱ्या पाचरस्ता परिसरात प्रथमच सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करून मंडळाने सामाजिक बांधिलकीची ग्वाही दिली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मंडळाने टेम्बलाई माता मंदिर आणि हनुमान मंदिर उभारले. प्रत्येक वर्षी ज्वलंत सामाजिक विषयांवर प्रबोधनात्मक देखावे सादर करणे ही मंडळाची खास परंपरा आहे. आणीबाणी, महागाई, अंधश्रद्धा, दहशतवाद, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूणहत्या, मतदार जनजागृती, पर्यावरण संवर्धन, पाणी बचत अशा अनेक विषयांवरील देखावे नाशिककरांनी पाहिले आहेत. नाशिक शहरात सर्वप्रथम हत्तीवरून गणेश मिरवणूक काढण्याची परंपरा या मंडळाने सुरू केली. तसेच १९७८ मध्ये मर्दानी खेळ सादर करून प्रथम पारितोषिक मिळवले. १९८० मध्ये हिंदू एकता आंदोलन स्थापनेनंतर मंडळाचे नाव बदलून शहीद भगतसिंग क्रांतिदल मंडळ ठेवण्यात आले आणि द्वारका चौकास ‘शहीद भगतसिंग चौक’ हे नाव देण्यात आले. मंडळाने काळानुरूप विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत. त्यामध्ये – सार्वजनिक दूरदर्शन संच स्थापना, पानपोई, वेवारस मृतांचे अंत्यसंस्कार, गरीब विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, मोफत अन्नदान व रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण व स्वच्छता मोहिमा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, अनाथाश्रम उपक्रम, रक्षाबंधन कार्यक्रम, पेटी वाचनालय स्थापना, पोलिस चौकीसाठी जागा दान आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत यांचा समावेश आहे. यावर्षी मंडळाने ‘एक पेड मा के नाम’ या विषयावर भव्य प्रबोधनात्मक देखावा उभारला आहे. पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण आणि झाडांचे संवर्धन याबाबत जागृती निर्माण करणारा हा देखावा नागरिकांच्या उत्सुकतेचा विषय ठरला आहे. राज्य सरकार, निवडणूक आयोग आणि विविध सामाजिक संस्थांनी मंडळाच्या या उपक्रमांना वेळोवेळी




गौरवले असून पारितोषिके बहाल केली आहेत. कार्यकारिणी मंडळ संस्थापक अध्यक्ष रामसिंग बावरी , उत्सव अध्यक्ष प्रियंका अहिरराव, कार्याध्यक्ष सुभाष जाधव , उपाध्यक्ष मंगला पवार, प्रकाश गायकवाड, उमेश पाटील, सरचिटणीस अतुल रणशिंगे, सचिव कल्पना गायकवाड, सहचिटणीस स्वप्निल काथवटे, खजिनदार: प्रसाद बावरी सल्लागार मंडळ : किरणसिंग पवार, महादु बेंडकुळे, सुरेश पवार, श्याम पवार, अनिल जाधव, अशोक गांगुर्डे, बाळासाहेब मोरे, जयश्री सदभैया, करणसिंग बावरी, किशोर बागमार, बाळासाहेब कऱ्हाड, प्रतापसिंग पवार, किशोर बोचके, सुनील साळवे, हिरामण वाईकर. स्वयंसेवक सदस्य राजेश धुमाळ, जीवा पवार, राजाभाऊ गाडगीळ, प्रतीक कसबे, शुभम गाडे, भारत सदभैय्या, रोशन जाधव, गुरुदेव पवार, नितीन काथवटे, आदित्य भालेराव, कुणाल चव्हाण, प्रेम पवार, ओम चव्हाण, मोहन खाडे, संजय पिंपळके, रुद्र सकट, नाना वाघ, भारत शेट्टी व परिसरातील नागरिक. शहीद भगतसिंग क्रांतिदल मंडळाचा ५९ वा गणेशोत्सव हा सामाजिक भान, राष्ट्रप्रेम आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा ठरत असून, संस्थापक अध्यक्ष रामसिंग भाऊ बावरी यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा होणारा हा उत्सव शहरवासीयांसाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय ठरत आहे.

## सावानात श्री गणेशाची उत्साही वातावरणात प्रतिष्ठापना!

**नाशिक ।** सार्वजनिक वाचनालयात प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही श्री गणेशाची प्रतिष्ठापना उत्साही वातावरणात करण्यात आली. सावानाच्या सदस्या, बालभवन प्रमुख सौ. प्रेरणा बेळे आणि निमाचे धनंजय बेळे यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. सावानाचे अध्यक्ष प्रा.दिलीप फडके यांच्या



मार्गदर्शनाखाली यावर्षी सार्वजनिक वाचनालयाने युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ म्हणून निवड केलेल्या १२ किल्ल्यांपैकी नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील ‘साल्हेर किल्याची’ प्रतिकृती साकारली आहे. तसेच इतर ११ किल्यांचा सर्वांना अधिक परिचय व्हावा म्हणून माहितीचे फलक तयार करून लावण्यात आले आहे. अतिशय आकर्षक आणि सर्वांच लक्ष वेधून घेणारी प्रतिकृती ठरली आहे. सर्वांनी आरासबद्दल आनंद व्यक्त केला आहे. पूजनाच्या वेळी उपाध्यक्ष वैद्य डॉ. विक्रांत वैद्य, प्रा.डॉ.सुनील कुटे, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, ग्रंथ सचिव देवदत्त जोशी, अर्थ सचिव गिरीश नातू, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, डॉ.धर्माजी बोडके, पुस्तक मित्र मंडळ प्रमुख मंगेश मालपाठक, व्यवस्थापक प्रा. दिलीप अहिरे, सहाय्यक ग्रंथपाल संजय रत्नपारखी, दिलीप बोरसे, जितेंद्र मालवीय यांच्यासह अनेक सभासद उपस्थित होते. वैद्य डॉ.विक्रांत जाधव यांच्या तर्फे ५६ भोगाचा प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## इंदिरानगरात साकारले कामाख्या मंदिर; भाविकांची दर्शनासाठी होतेय गर्दी...

**इंदिरानगर ।** भाजपा प्रणित इंदिरानगर उत्सव समितीला यंदा ११ वर्ष पूर्ण होत असून, मंडळाच्या या वर्षानिमित्त पृथ्वीवरील ५१ शक्तीपीठां पैकी सर्वात पवित्र आणि सर्वात जुने मानले जाणाऱ्या आसाम राज्यातील गुवाहाटी येथील माँ कामाख्या देवीच्या मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली आहे.

गणेशोत्सवात हा देखावा भाविकांसाठी खास आकर्षण ठरणार आहे. इंदिरानगरातील भाजप प्रणित इंदिरानगर उत्सव समितीची स्थापना २०१४ साली झाली आहे. इंदिरानगर येथील बापू बंगल्यासमोरील माजी नगरसेविका सुप्रिया खोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या प्रांगणात श्री कामाख्या देवीच्या मंदिराचा प्रतिकृतीचा देखावा साकारण्यात आला असल्याची माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगरसेवक सुनील खोडे यांनी दिली. खोडे म्हणाले की, समितीत १०० पेक्षा जास्त महिला व ज्येष्ठ नागरिकांसह सभासद संख्या असून, सर्व समाजाचे सदस्य आहेत. यंदा गिरीश पाठक हे अध्यक्ष आहेत तर स्वागत कार्याध्यक्ष म्हणून प्रवीण नागरे आहेत. देखाव्याचे कामकाज माजी नगरसेविका सुप्रिया खोडे, निखिल खोडे यांनी पाहिले. देखरेख उपाध्यक्ष उमेश जाधव, दीपक लोंढे यांच्यासह जेष्ठ सभासद यांनी केली. गेल्या ११



वर्षात समितीने आतापर्यंत विविध धार्मिक, पौराणिक देखावे सादर केले आहेत. ११ वर्षांच्या प्रवासात मंडळाने इंदिरानगर गणेशोत्सवाला वेगळे वैशिष्ट्य प्राप्त करून दिले आहे.

शहरात शहरातील व राज्यातील देशपातळी वरील नैसर्गिक आपत्तीत नेहमीच आर्थिक व वस्तु रुपात मदतीचा हात दिला आहे. या वर्षी मंडळाने गुवाहाटी येथील प्रसिद्ध कामाख्या देवी मंदिराचा देखावा साकारलाआहे, हे शिल्प बंगाल येथील वास्तुविशारद यांनी ५० फूट लांब, ५० फूट उंच देखाव्या साठी २० हजार बाबू, ८ हजार मीटर कापड, १० हजार बल्ल्या, ५० हजार फूट बॉटम पट्टी वापरली आहे. १५ कारागीरांनी वेळेत भव्य, आकर्षक मंदिराचा देखावा उभारला आहे. जयंत लाळे, संकेत खोडे, अँड. मंदर अवचट, शुभम गुंजाळ,ओम उगले आदी पदाधिकारींनी विशेष परिश्रम घेतले आहे.



### ..हे आहे महत्त्व!

माँ कामाख्या किंवा कामेश्वरी ही कामना करणारी प्रसिद्ध देवी आहे ज्यांचे प्रसिद्ध मंदिर ईशान्य भारतातील आसाम राज्याची राजधानी असलेल्या गुवाहाटीच्या पश्चिम भागात असलेल्या निलांचल टेकडीच्या मध्यभागी आहे. माँ कामाख्या देवालय हे पृथ्वीवरील ५१ शक्तीपीठांपैकी सर्वात पवित्र आणि सर्वात जुने मानले जाते. हे भारतातील व्यापकपणे प्रचलित असलेल्या,शक्तिशाली तांत्रिक शक्तीवाद पंथाचे केंद्रबिंदू आहे. कामाख्या मंदिर हे सर्व शक्तीपीठांचे महापीठ मानले जाते.

## मनु मानसी संस्था, रिलायन्स ज्वेलर्स यांच्या संयुक्त विद्यमाने मोदक स्पर्धा

**नाशिक ।** सध्या गणेशोत्सवाची सर्वत्र धूम सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर येथील मनु मानसी महिला बहूउद्देशीय संस्था आणि रिलायन्स ज्वेलर्स यांच्या संयुक्त विद्यमाने मोदक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



या स्पर्धेत महिलांनी उत्साहाने सहभागी होऊन वेगवेगळ्या प्रकारचे मोदक बनवून आणले. शुगर फ्री मोदक, कलाकंद, मावा, गुलाब, गोकर्ण फुलापासून बनविलेले मोदक, पौष्टिक मोदक असे अनेक प्रकारचे चविष्ट मोदक बनवून सजावट केले. गणपती बाप्पाला मोदक हा पदार्थ खूप प्रिय असतो. म्हणून दरवर्षी मनु मानसी संस्थेच्या वतीने सणानुसार उपक्रम राबविले जातात. मोदक स्पर्धेत प्रथम क्रमांक अनिता देसाई, द्वितीय क्रमांक दीपाली उपगलनवार, तृतीय क्रमांक मोनाली हारदे यांचा आला. सर्व सहभागी स्पर्धकांना वृक्षरोप आणि भेटवस्तू देण्यात आली. विशेष सहकार्य रिलायन्स ज्वेलर्स यांचे लाभले. यासाठी मनु मानसी संस्थेच्या संस्थापिका मेघा शिंपी, रिलायन्स ज्वेलर्सचे स्टोअर मॅनेजर अनिस शेख, मोनाली हारदे आणि अनुपमा जोशी यांच्या प्रयत्नातून मोदक स्पर्धा उत्साहात पार पडली.

## महिलांचा उत्साह...

**नाशिक । शहर परिसरातून महिला भाविकांनी आपल्या घरी केलेला गणपतीचे आरास ‘दै. महानगर’ कार्यालयास पाठविलेले आहेत. त्यातील काही निवडक आरास असे...**

## नाशिक गणेश दर्शन...


सुजाता देव


संगीता सुनिल उपासनी


ज्योती मुकेश कुमावत


पूजा सरोदे


भारती सरोदे


शितल हिरे


आसावरी कुटे



सुजाता जगताप

## गणेश दर्शनासाठी गर्दी सुरू

**नाशिक ।** गणेशोत्सव सुरू होऊन चार दिवस लोटले आहेत. आता गणेशोत्सव रंगात येऊ लागला आहे. नागरिक आरास, देखावे बघण्यासाठी घराबाहेर पडू लागले आहेत. यंदा धार्मिक, पौराणिक आणि प्रबोधनात्मक देखावे भरपूर प्रमाणात आहेत. संध्याकाळचे वेळेस देखावे आरास बघण्यासाठी भाविकांची गर्दी होताना दिसून येत आहे. पावसाने काही काळ उघडीप दिल्याने नागरिकांचा उत्साह वाढलेला दिसून येत आहे.


लता केदारे


सुषमा सचिन शिंदे


सानिका उमराळकर


शिवानी आंधळे

# काकांचा संयम ढळला?

**पंचनामा**
**मनोज बागडे**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसे डॅशिंग व्यक्तीमत्व. शेतीला पाणी देण्यासाठी, नहरात पाणी सोडण्यासाठी ते कधी कोणत्या धरणात ..णार? याचा अंदाज कोणालाच नाही. आमचे एक मित्र बारामतीला अधिकारी असतानाचे अनेक प्रसंग ते सांगतात. दादांचा कामाचा धडाका मोठा आहे. आठवडा, पंधरा दिवसात ते तिकडे बैठका घ्यायचे, लोकांची अडली नडली कामे करण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना झापायचे, सर्वांसमोर कानउघाडणी करायचे. अर्थात, जनतेची कामे करण्यात त्यांचा हात कुणी पकडू शकत नाही, असे आमचे ते मित्र ठासून सांगायचे. काँगेससोबत अनेक वर्षे आणि नंतर उद्धव ठाकरेंसोबतच्या महाविकास आघाडीमध्ये असताना हेच दादा भाजपावर सडकून टीका करायचे, आसूड ओढायचे. नागपूर दौऱ्यात संघाच्या मुख्यालयात ते गेले नाहीत, हेडगेवार यांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक झाले नाहीत. पण, सत्तेसाठी माणूस किती लाचार होतो? ज्या काकांनी त्यांना बोट धरून चालायला शिकवले, राजकारणात आणले, उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहचविले, त्याच काकांच्या म्हणजे शरद पवारांच्या पाठीत खंजीर खुपसून दादांनी उपकाराची परतफेड केली. राष्ट्रवादी काँग्रेसचा हा गट फुटणे, फोडणे, यातही मोठी गोम असल्याचे बोलले जात आहे. ज्या भाजपावर आणि त्यांच्या पितृसत्ताक संघटनेवर दादा टीका करायचे त्याच पक्षासोबत त्यांनी घरठाव केला. विकासासाठी आम्ही हा निर्णय घेतल्याचे ते कितीही सांगत असले तरी, सत्तर हजार कोटींचा सिंचन घोटाळा, त्यांच्या सग्या सोबत्यांचे अरबो रूपयांचे घोटाळे दाबण्यासाठी, ईडी आणि अन्य तपास यंत्रणांचा ससेमिरा टाळण्यासाठी त्यांना महायुतीत जमवून घ्यावे लागले, हे सर्वश्रूत आहे. महायुतीत आल्यानंतर ज्या काकांना ते नेहमी उत्तर देतात, तीच वेळ आज काका म्हणून त्यांच्यावर आली आहे. आमदार असलेले पुतणे रोहित पवार सवाल करू लागले आहेत आणि काका म्हणून संयमित उत्तर देण्याऐवजी या दादा काकांचा संयम ढळू लागला आहे. चुरूचुरू बोलायला लागलास... हे त्यांचे वक्तव्यच अंतर्गत निराशेचे द्योतक आहे.





भावकीने लक्ष दिले म्हणूनच तू निवडून आलास, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार रोहित पवारांच्या गावकीच्या नादात भावकी विसरल्याच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. यावेळी त्यांनी आपल्या चेहऱ्यावरील हास्य कायम ठेवत रोहित यांना अप्रत्यक्षपणे आपल्या नादाला न लागण्याचाही सल्ला दिला. परंतु, आमदार रोहित पवार अर्थात आपल्या पुतण्यावर टीका करताना उपमुख्यमंत्री आणि एक काका म्हणून अजित पवार तेवढे खुश होते का?

रोहित पवार यांनी सांगलीच्या इस्लामपूर येथे आयोजित एका कार्यक्रमात अजित पवारांना भावकीची आठवण करून दिली होती. अजित पवारांना गावकीच्या नादात भावकीचा विसर पडला आहे. त्यांनी निधीच्या बाबतीत कुठेतरी याचा विचार करावा, असे ते म्हणाले होते.

त्यानंतर अजित पवारांनी लागलीच त्यांच्या या विधानाचा खरपूस समाचार घेतला. रोहित म्हणाला की दादांचे गावकीकडे लक्ष आहे, भावकीकडे नाही. पण भावकीकडे लक्ष दिले म्हणूनच तू आमदार झालास. आपण पोस्टल बॅलेटवर निवडून आला आहात हे लक्षात असू द्या. जयंतराव (जयंत पाटील) त्याला विचारा, किती मते पडली आहेत? असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी हसत रोहित यांना आपल्या नादी न लागण्याचाही सल्ला दिला.

मी महायुतीत गेल्यापासून कुणावरही टीका केली नाही. तुम्ही तुमच्या विचाराने चालत आहात, मी माझ्या विचाराने चालत आहे. पण त्यात आम्ही फुले शाहू आंबेडकरांच्या विचारधारेशी कुठेही तडजोड केली नाही. मला रोहितने सांगितले की, जयंत पाटील व मी हेलिकॉप्टरने जाईन. त्यावेळी मला वाटले की, ते माझे भाषण ऐकायला दोघेही नसणार. पण माझे नशीब बघा हे दोघेही भाषण ऐकायला आहेत, असे ते म्हणाले.

**खूप चुरूचुरू बोलायला लागलाय**

मी रोहितचे भाषण ऐकत होतो. खूप चुरूचुरू बोलायला लागला आहे, असे सांगून अजित पवारांनी स्वतःचे उदाहरण दिले. ते म्हणाले, 1990 साली मी, जयंत पाटील आर. आर. पाटील पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आलो. 1990, 1995 आणि 1999 असे तीन टर्म लागोपाठ निवडून आल्यानंतरही 1999 च्या आघाडी सरकारच्या काळात आम्हाला फार स्पेस मिळाली नाही. 2004 साली थोडी संधी मिळाली. पण हल्ली काही काही जणांना पहिल्या टर्मलाच भाषणबाजी करायची असते. मी म्हणजे कुणीतरी मोठा अशा अर्विभावात ते दुसऱ्या पक्षालाही सल्ले देत फिरतात.

**मग आम्ही देखणे नाही काय?**

अजित पवारांनी यावेळी जयंत पाटील हे आवाजात प्रेमळपणा असणारे देखणे व्यक्तीमत्व असल्याच्या एका उल्लेखाचा दाखला दिला. जयंत पाटील म्हणजे देखणे नेतृत्व. मग आम्ही देखणे नाही काय? कार्यक्रमाला वाळव्यात बोलवायचे आणि आमचीच बिन पाण्याने करायची, असे ते म्हणाले. त्यांचे हे विधान ऐकताच कार्यक्रमस्थळी एकच हशा पिकला.

तत्पूर्वी, रोहित पवारांनी आपल्या भाषणात अजित पवारांना टोला हाणला होता.

ते म्हणाले होते, काही वर्षांपूर्वी अधिवेशनात मी भाषण केले होते. अनेक लोकांनी सांगितले की, भाषण चांगले झाले. मग मला अजितदादांचा फोन आला. त्यावेळी आम्ही पार्टी म्हणून एकत्र होतो. त्यांनी मला घरी बोलावले. माझी अपेक्षा होती की, ते माज्या भाषणाचे कौतुक करतील. अजून चांगले भाषण कर असे म्हणतील.

पण त्यांनी सांगितले, भाषण चांगले झाले, पण एक महत्त्वाची गोष्ट तुला सांगतो. भाषण देत असताना कॅमेरा तुज्यावर फोकस असतो. त्यामुळे शर्टचे वरचे बटण वगैरे लावत जा. त्यांचे एवढे बारीक लक्ष माज्यावर होते. आता ते गावकीचा विचार करतात, पण भावकीचा विचार कुठेतरी विसरलेत. कुठेतरी निधीच्या बाबतीत त्यांनी विचार करावा, असे ते मिश्किलपणे म्हणाले.

खरे तर अजित पवारांनी आमदार रोहित पवार यांच्या टीकेला उत्तर देताना जे वक्तव्य केले ते पूर्णतः निराशा आणि रागाने भरलेले आहे. त्यांच्या विधानात एक प्रकारचा अहंकाराचा दर्प आहे, धमकी आहे. माझ्यामुळे तुम्ही आहात, माझे काहीच वाकडे करू शकत नाही, या अविर्भावात त्यांनी घरच्यांनाही संकेत दिल्याचे दिसून येते.

सत्तेत सहभाग मिळाल्याने, अजित पवार यांचे पक्षातील निकटवर्तीय जसे प्रफुल पटेल आणि अन्य काही नेते हवेत वावरताहेत. पण, काही गोष्टी ते विसरलेत की सोबतीला घेवून, भाजपा त्यांच्याच घरात घुसतो आहे. सहकार क्षेत्रात स्वतःची मक्तेदारी निर्माण करतो आहे. मारकुंड्या सूरज चव्हाणला आधी निलंबीत केले आणि पुन्हा थेट राष्ट्रीय स्तरावर सरचिटणीस केल्याने दादांच्या पक्षात अंतर्गत प्रचंड धुसफूस आहे.

सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी गटात प्रमुख म्हणून पदावर आरूढ अजित पवार पक्षातील ऑलबेलविषयी हसून एव्हरीथिंक इज ओके असे सांगत फिरत असले तरी ओके नक्कीच नाही. विदुषकाचे सोंग घेवून हास्य पेरता येवू शकेल. पण आतल्या रडगाण्याचे काय?

रोहित पवारांनी ओढलेल्या आसूडामुळे अजित पवार कमालीचे हादरल्याचे दिसते. त्यांचा संयम ढळू लागला आहे. त्यांच्या सोबतची शिंदेसेना आणि भाजपालाही हेच हवे आहे. पिंजऱ्यातील पोपटाने शिळच घालायची असते, दुसऱ्यावर डाफरायचे नसते, हे त्यांना कुणी सांगावे?

# भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व : प्रणव मुखर्जी

भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचा आज स्मृतिदिन. पाच वर्षापूर्वी ३१ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता कारण प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एक ऋषितल्य व्यक्तिमत्व होते.

-----------------



प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एकमेव असे व्यक्ती होते की ज्यांच्याविषयी सर्वसामान्य नागरिकांपासून ते पंतप्रधानांपर्यंत आणि सत्ताधारी पक्षांपासून विरोधी पक्षांपर्यंत सर्वांनाच कमालीचा आदर होता.

भारतीय राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले प्रणव मुखर्जी यांना भारतीय राजकारणातील भीष्म पितामह म्हणावे लागेल कारण जवळपास पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी भारतीय राजकारणात घालवले.

त्याचा जन्म ११ डिसेंबर १९३५ चा. त्यांचे वडील स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. त्यासाठी त्यांनी दहा वर्ष कारावासही भोगला. प्रणव मुखर्जी यांचे वडील काँग्रेस कमिटीचे सदस्य होते तसेच पश्चिम बंगाल विधानपरिषदेचे अध्यक्ष होते त्यामुळे लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले.

प्रणव मुखर्जी यांनी कोलकाता येथील विद्यासागर विद्यापीठातून एम ए आणि एल एल बी केले. राजकारणात येण्याआधी त्यांनी काहीकाळ प्राध्यापक म्हणून नोकरी केली तर काहीकाळ पत्रकारिताही केली. पण लहानपणीच राजकारणाचे बाळकडू मिळाल्याने त्यांनी १९६९ साली राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच आपल्या वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्वाच्या जोरावर मंत्रिपदापर्यंत मजल मारली.

आपल्या तल्लख बुद्धीने आणि दूरदृष्टीने त्यांनी त्या पदावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. नियोजन आयोगाचे अध्यक्ष, राज्यसभेचे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते, गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री तसेच विविध संसदीय समित्यांची अध्यक्षपदे अशी अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषवली. या सर्व पदांवर त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

प्रणव मुखर्जी हे त्यांच्या विविध लोकाभिमुख निर्णयाने देशभर चर्चेत राहिले. राष्ट्रपतीपद ग्रहण करण्यापूर्वीपासूनच संसदीय लोकप्रणालीत अद्ययावत माहिती ठेवणारे नेते म्हणून प्रणव मुखर्जी यांची ख्याती होती. लोकसभेत विविध पदे भूषवताना संसदेच्या आवारात अगदी विरोधी पक्षातील दिग्गज नेतेही त्यांच्याशी महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करताना आढळत.

नव्या खासदारांसाठी त्यांचे भाषण, संसदीय आयुधे वापरून प्रश्न उपस्थित करणे हे प्रशिक्षणच होते. गृह, अर्थ, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण याबाबतचे त्यांचे ज्ञान चकित करणारे होते त्यामुळेच त्यांना भारतीय राजकारणात व ज्ञानी वर्तुळात संसदीय प्रणालीची एक चालती बोलती लायब्ररी संबोधले जायचे म्हणूनच राष्ट्रपतीपदी त्यांची निवड झाल्यावर एका योग्य नेत्याची निवड झाली अशीच भावना संपूर्ण देशाची झाली होती.

राष्ट्रपतीपद हे घटनेतील सर्वोच्चपद आहे. या पदाला एक मान आहे, प्रतिष्ठा आहे. एक वेगळा शिष्टाचार असलेले हे पद आहे. राष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर त्यांनी या पदाची प्रतिष्ठा वाढवण्याचेच काम केले.

प्रणव मुखर्जी यांनी राष्ट्रपती पदाच्या पूर्वी लावले जाणारे महामहीम हा शब्द न वापरण्याची प्रशासनाला सूचना केली. हे पद आणि त्याची समावेशकता वाढवण्याचा हा महत्वाचा निर्णय होता. भारतीय लोकशाहीचा इतिहास जगाला सांगणारा, जगाची भाषा समजणारा एक ऋषितुल्य वक्ता याठिकाणी विराजमान असल्याचे समाधान देशाला मिळाले.

३१ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाची कधीही भरून न निघणारी हानी झाली. त्याच्या निधनाने भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व हरपले. भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले माजी राष्ट्रपती स्वर्गीय प्रणव मुखर्जी यांना त्यांच्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

# इन्कमटॅक्स धाडी मध्ये जुनी सोन,चांदी ज्वेलरी रुपात सापडल्यास टॅक्स लागतो का?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**

सर्वात आधी वाचकांचे प्रश्नोत्तर बघणार आहोत; जे सर्व वाचकांना उपयोगी ठरावे.

**प्रश्न** - मी एक अतिज्येष्ठ सदस्य आहे. मी वृतपत्रात नेहमी कायद्याचा सल्ला वाचत असतो. मी विक्रीकर विभागाचा माजी अधिकारी असून, एल.एल.बी. (वकील) आहे. मुंबईत गेली 40 वर्षे कर सल्लागार म्हणून काम केले. सद्या पुण्यात स्थाई असून, भारताचे प्रसिद्ध उद्योजक डालमिया, नाहर, ओसवाल यांच्याबरोबर आमचा वरिष्ठ मित्र ग्रुप आहे.

आमच्या ग्रुपचा प्रश्न आहे की स्वकष्टातून बांधलेला बंगला भोपाळ येथे आहे. हा बंगला विकून पुण्यात दोन फ्लॅट घेणे आहे. भोपाळ येथील बंगल्याची किंमत सहा कोटी आहे तर आम्हाला कॅपिटल गेन टॅक्स लागेल का? माझे वय 93 वर्ष असून, मी इन्कमटॅक्समध्ये अति ज्येष्ठ नागरिक आहे.

**ॲड. एकनाथ गांगल**
**ए - 302, प्रीस्टाइन प्रोफाईल, फेज-1, वाकड, पुणे. (8879842882)**

● आपला प्रश्न व्यावहारिक आहे. इन्कमटॅक्स कायद्यानुसार आपल्याला कलम 54 खाली वजावट मिळेल. या वजावटीमुळे आपल्याला इन्कमटॅक्स म्हणजे कॅपीटल गेन टॅक्स लागणार नाही. मात्र, त्याच्या ज्या अटी असतात, त्या आपल्याला पूर्ण कराव्या लागतील. विविध हायकोर्ट तथा सुप्रीमकोर्टाने यास विविध केसेसमध्ये मान्यता दिली आहे.




**प्रश्न** - इन्कम टॅक्सच्या धाडीमध्ये 6 वर्षापुर्वीचीज्वेलरी सापडल्यास ती ज्वेलरी इन्कमटॅक्स अधिकारी जप्त करू शकतात का? जप्तीशिवाय दुसरी काही कारवाई करू शकतात का?

● सोप्या भाषेत वरील प्रश्नाचा अर्थ असा आहे की, करदात्याकडे इन्कमटॅक्सची धाड पडलेली आहे. त्या धाडीमध्ये यांना खूप सोनं किंवा ज्वेलरी सापडली आहे. विशेष म्हणजे करदात्याकडे सोन्याचे बिल आहे.

परंतु, इन्कमटॅक्सवाल्यांचे स्पष्ट म्हणणे आहे की, या सोन्याची खरेदी ही काळ्या पैशातून केली आहे म्हणून आम्हाला त्याची जप्ती करून त्या सोन्यावर इन्कमटॅक्स लावायचा आहे. तर अशा प्रसंगी ते धाडीत आलेले अधिकारी टॅक्स लावू शकतात की नाही.

याचे सोप्या भाषेत उत्तर असे आहे की, जर हा खरेदीचा व्यवहार पावतीद्वारे सिद्ध झाले की सहा वर्षापूर्वीचा आहे, तर इन्कमटॅक्स अधिकारी त्या व्यवहारास डमी (बनावट) म्हणून चॅलेंज करु शकत नाहीत.

**प्रश्न** - इन्कमटॅक्स अधिकारी यांना करदात्याच्या घरी एका महिलेकडे सोनं सापडले तर त्या सोन्यास अधिकारी जप्त करू शकतात का?

● याच्या दोन शक्यता (संधी) असू शकतात. पहिली शक्यता म्हणजे त्या महिलाकडे जुने सोने खरेदीचे बिल आहे. अशा वेळेस त्या महिलेस जर बील सहावर्षा पूवीर्चे असेल तर इन्कमटॅक्स अधिकारी काही प्रश्न विचारण्याचा प्रश्न येणारच नाही.

याला दुसरी शक्यता अशी की, त्या महिलेकडे बिल नाही तर इन्कमटॅक्स अधिकारी त्या महिलेस प्रश्न विचारून ते सोने जप्त करू शकतात का? गंमत म्हणजे येथेसुद्धा इन्कमटॅक्स अधिकारी प्रश्न विचारून जप्त करू शकत नाही.

कारण जुने परिपत्रक क्र.1916 जे 11 मे 1994 चे आहे, त्यात स्पष्ट सुचना आहे की, जर महिलेकडे सोन्याचे बिल नसेल मात्र सोनं सर्कुलर प्रमाणे असेल, तर इन्कमटॅक्स अधिकारी त्या महिलेचे सोने जप्त करु शकत नाहीत. मुळात त्यांना तसे अधिकारच नाही.

**प्रश्न** - समजा वरील प्रश्नातच त्या महिलेकडे सोने कमी सापडले तर सोनं त्या महिलेने विकून टाकले म्हणून कारवाई करू शकतात का?

● हा प्रश्न फार महत्वाचा आहे की, अनेक जागी महिलांकडे सोन्याचे धबाड सापडतच असते व अधिकारी ते सोनं जप्तही करतात. परंतु, एका केसमध्ये सोनं प्रमाणापेक्षा कमी सापडले म्हणून अधिकाऱ्यांनी सोने विकले गेले म्हणून त्यांच्यावर इन्कमटॅक्स लावला.

या इन्कमटॅक्सला कॅपिट गेन टॅक्स म्हणतात. कोर्टाने स्पष्ट संकेत दिलेले आहे की, अशा वेळेस बळजबरी सोनं विकले असे म्हणून त्या महिलेकडून इन्कमटॅक्स वसुल करता येत नाही.

ज्या वाचकांना इन्कमटॅक्ससंबधी काही प्रश्न असतील त्यांनी 9422218428 या नंबरवर फक्त व्हॉट्सॲप करावे, ज्याची उत्तरे याच पेपरच्या लेखमालेत विनामुल्य देण्यात येतील.

# सुपरस्टार विजयचे कडवे आव्हान!

सिंहाला गर्दीमध्ये कसं रहायचं हे समजतं आणि एकटं कसं रहायचं हेही समजतं. सिंह गुहेतून बाहेर पडतो, शिकार करण्यासाठी, कुणाची करमणूक करण्यासाठी नाही. सिंहाच हे वैशिष्ट्य सांगून, स्वतःची तुलना सिंहाशी करणारा तामिळनाडूमधील सुपरस्टार विजय हा आपला नवीन पक्ष (तमिलगा वेत्री कळघम) बरोबर घेऊन राज्याच्या राजकारणात उतरला असून, त्याने राज्यातील प्रस्थापित पक्ष, द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या समोर कडवे आव्हान उभे केले आहे.

एखाद्या सिनेस्टारने राजकारणात प्रवेश करणे ही गोष्ट तामिळनाडूसाठी नवीन नाही. याअगोदर शिवाजी गणेशन, एम. जी. रामचंद्रन, जयललिता, विजयकांत, कमलहासन यांनी राजकारणात उतरुन आपली ताकद तिथे दाखवून दिली आहे. नुकतीच सिनेस्टार विजयने तामिळनाडूतील मदुराई येथे आपल्या पक्षाची जी परिषद घेतली, तिला विजयच्या फॅन्सनी जी प्रचंड गर्दी केली ती पाहता, विजयला आणि त्याच्या पक्षाला लाईटली घेणे, सत्ताधारी द्रमुक आणि अण्णा द्रमुक या तामिळनाडूमधील महत्त्वाच्या पक्षांना महागात पडू शकेल.

सध्या तामिळनाडूच्या राजकारणात द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी सत्तेवर असून, त्या आघाडीत काँग्रेस, डावे पक्ष आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे. अण्णा द्रमुक हा प्रमुख विरोधी पक्ष असून, त्याच्या नेतृत्वाखालील आघाडीत भाजपा, पीएमके आणि इतर छोटे पक्ष आहेत.

सिनेस्टार विजयने आपला पक्ष एकट्याच्या बळावर तामिळनाडूमधील विधानसभा निवडणुका लढेल,असे अगोदरच जाहीर केले आहे. तामिळनाडूमध्ये पुढील वर्षी विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.विजयचा पक्ष स्वबळावर लढणार असल्याने, तामिळनाडूमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.



विजयने जाहीर केले आहे की राज्यातील सत्ताधारी द्रमुक हा पक्ष आपला राजकीय विरोधक असून भाजप हा आपला वैचारिक विरोधक आहे. भाजप हा प्रतिगामी पक्ष असून, त्याच्या बरोबर आपण कधीही युती करणार नाही, असे त्याने स्पष्ट केले आहे. त्याने स्वतःला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित केले असून, कोणत्याही परिस्थितीत द्रमुकला सत्तेवरून खाली खेचण्याचा त्याने पण केला आहे.

अर्थात द्रमुकला हरवणे त्याला वाटते तितके सोपे नाही. त्याच्या पाठीमागे लाखो फॅन्सची फौज आहे. परंतु द्रमुक सारखी मजबूत संघटना त्याच्याकडे नाही. माजी मुख्यमंत्री करुणानिधी यांनी बरेच कष्ट घेऊन द्रमुकची संघटना तळागाळापर्यंत पोहोचवली. अण्णाद्रमुक बरोबर टक्कर देत त्यांनी पक्षाला निरनिराळ्या निवडणुकांत विजय मिळवून दिला.

१९६७ साली अण्णा दुराई यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक हा पक्ष तामिळनाडूमध्ये पहिल्यांदा सत्तेवर आला.तामिळ अस्मिता आणि हिंदी भाषेला प्रखर विरोध हे मुद्दे हातात घेऊन द्रमुकने काँग्रेसचा पराभव केला आणि त्यानंतर द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे पक्ष आलटून पालटून तामिळनाडूमध्ये सत्तेवर आले. १९६७ मध्ये काँग्रेसचा पराभव झाल्यानंतर, जनतेने आजवर कोणत्याही राष्ट्रीय पक्षाला राज्यात सत्तेवर येऊ दिले नाही.

१९७२ साली एम. जी. रामचंद्रन हे द्रमुक मधून बाहेर पडले आणि त्यांनी अण्णा द्रमुक या पक्षाची स्थापना केली. १९७७ साली झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये एम. जी. रामचंद्रन यांच्या नेतृत्वाखालील अण्णा द्रमुक या पक्षाने विजय मिळवला आणि एम. जी. रामचंद्रन हे तामिळनाडूचे मुख्यमंत्री बनले. १९८७ साली त्यांचे निधन होईपर्यंत ते मुख्यमंत्री पदावर होते.



**अभय गोखले**

एम.जी.रामचंद्रन हे अतिशय लोकप्रिय अभिनेते होते. तसेच द्रमुक मधून बाहेर पडताना त्यांनी पक्षसंघटनेचा मोठा भाग आपल्या बरोबर नेल्याने, त्यांना निवडणुका जिंकण्यासाठी त्याचा खूप फायदा झाला. सिनेस्टार विजय याची समस्या अशी आहे की तो सिनेसृष्टीतून डायरेक्ट राजकारणात आल्याने त्याच्याकडे संघटनेचा अभाव आहे.

यापुर्वी सिनेस्टार विजयकांत यांनीही विजय याच्याप्रमाणे आपली हवा निर्माण केली होती, परंतु ते द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या समोर टिकाव धरू शकले नाहीत. कारण त्यांच्याकडेही मजबूत संघटना नव्हती. त्यांनी स्थापन केलेल्या डीएमडीके या पक्षाला विधानसभेच्या २९ जागांवर विजय मिळाला होता आणि ती त्यांच्या पक्षाची सर्वोत्तम कामगिरी होती.

सिनेस्टार कमलहासन यांनीही तामिळनाडूच्या राजकारणात आपले भविष्य आजमावण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी स्थापन केलेल्या पक्षाला राज्यातील मतदारांनी साफ नाकारले.

या पार्श्वभूमीवर विजय यांच्या पक्षाची पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत कशी कामगिरी होऊ शकेल, याबाबत अंदाज बांधता येईल. तामिळनाडूमध्ये सध्या सत्तेवर असलेली द्रमुक प्रणित आघाडी मजबूत अवस्थेत आहे. लोकसभा निवडणुकीत नेत्रदीपक कामगिरी करून, या आघाडीने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यामुळे विजय याच्यासाठी सामना सोपा नसेल.

त्याशिवाय अण्णा द्रमुक प्रणित आघाडीही निवडणूक रिंगणात असणार आहे.विजयने आपल्या भाषणात द्रमुकवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, तसेच राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था परिस्थितीबाबत त्याने द्रमुक सरकारवर टीका केली. मात्र राज्यातील जनतेने त्याच्या पक्षाला सत्तेपर्यंत पोहचवले तर तो जनतेकरता काय करणार आहे हे तो व्यवस्थितपणे मांडू शकला नाही.

सिनेस्टार विजयकडे त्याच्या फॅन्सची मोठी फौज असली तरी, त्यामध्ये सुसूत्रता नाही, केवळ उत्साह आहे. मात्र त्याच्या विरोधातील द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे पक्ष कसलेले आहेत, त्यांच्याकडे राजकारणाचा प्रदिर्घ अनुभव आहे, हे लक्षात घेता, पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्याच्या पक्षाची कामगिरी कशी होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# शिक्षक होण्याच्या स्वप्नांचा भंग!

(कालच्या अंकावरून पुढे)

-----------------

आज महाराष्ट्रातील हजारो शिक्षक पदासाठी तरुणांचा प्रश्न एकच आहे,"जागा भरती कधी होणार?" सत्ताधारी पक्षाकडून फक्त घोषणा होत आहेत, पण ठोस पावले उचलली जात नाहीत. परिणामी तरुणाईत तीव्र असंतोष आहे. हा फक्त रोजगाराचा प्रश्न नाही. हा तरुणांच्या भविष्याचा, समाजाच्या संस्कारांचा आणि शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न आहे. जर सरकारने तात्काळ जागा भरती केली नाही, तर या तरुणांचा असंतोष लवकरच उग्र रूप धारण करेल. शासनाने शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. ज्यामुळे तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि शिक्षण क्षेत्र पुन्हा प्रगतीच्या मार्गावर जाईल.

महाराष्ट्रातील शिक्षक भरतीची प्रलंबित प्रक्रिया फक्त एक रोजगाराचा प्रश्न नाही, ती तर तरुणांच्या भवितव्याशी, समाजाच्या संस्कारांशी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेशी थेट निगडीत गंभीर संकट आहे. दोनझअडीच वर्षांपासून सुरू असलेल्या घोषणाबाजीतून स्पष्ट दिसते की शासनाने या समस्येकडे तातडीने आणि ठोस दृष्टीने लक्ष दिलेले नाही.

शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे महाविद्यालयांमध्ये दर्जेदार अध्यापन कमी झाले आहे, विद्यार्थ्यांचे भविष्य अधोरेखितपणे धोक्यात आले आहे. वर्षानुवर्षे मेहनत करून पात्र ठरलेले तरुण मानसिक, सामाजिक आणि आर्थिक असुरक्षिततेच्या अंधारात अडकले आहेत. त्यांच्या स्वप्नांचा चुराडा होत आहे; विवाहाची आणि कौटुंबिक जीवनाची योग्य वेळही अनिश्चिततेमुळे गमावली जात आहे.

सरकारकडे भरतीसाठी आर्थिक साधने असूनही ती चुकीच्या योजना, भव्य जाहिराती आणि प्रचारात्मक मोहिमांवर खर्च केली जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020 मध्ये शिक्षणासाठी जीडीपीच्या ६ % खर्च करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असले तरी, प्रत्यक्षात त्या दिशेने पावले उचलली जात नाहीत. या विसंगतीमुळे तरुणांचे मनोबल ढासळते आणि समाजातील विश्वासही कमी होतो.

शेवटी असे म्हणायचे का? की, आजची तरुणाई राजकीय मतभेद आणि निर्णय घेण्यात असमर्थता, यामुळे भरती प्रक्रिया ढिलाईची शिकार झाली आहे. सत्तेत असूनही जबाबदारी टाळणे आणि धोरणातील विसंगती हा भार फक्त तरुणांवर येतो.

हजारो पात्र तरुण वर्षानुवर्षे मेहनत करूनही अशाश्वततेच्या अधिवासात अडकले आहेत; त्यांच्या स्वप्नांचा, मेहनतीचे फळ मिळत नाही आहे. या सर्व समस्यांवरून स्पष्ट होते की, शासनाने तातडीने शिक्षक भरती प्रक्रिया सुरळीत करणे, आवश्यक आर्थिक तरतूद करणे आणि शिक्षण क्षेत्रात वास्तविक सुधारणा राबवणे अत्यावश्यक आहे. अन्यथा तरुणाईतील असंतोष उग्र रूप धारण करेल आणि त्याचा परिणाम केवळ शिक्षणावरच नाही तर संपूर्ण समाजाच्या शाश्वत विकासावरही होईल.

२००४-०५ पासून शिक्षकेत्तर कर्मचारी भरती बंद आहे. तब्बल २० वर्षांपासून भरती न झाल्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील हजारो पदे रिक्त आहेत. या रिक्त जागांमुळे महाविद्यालयांचे व्यवस्थापन ढासळले आहे, प्राचार्यांना प्रशासन सांभाळण्यास मोठा ताण येतो, विद्यार्थी मार्गदर्शन, ग्रंथालय, प्रयोगशाळा यांसारख्या सुविधा व्यवस्थित चालत नाहीत. तरीही शासन फक्त घोषणांची आतषबाजी करत आहे, प्रत्यक्षात ठोस पावले उचललेली नाहीत.

प्राचार्य आणि शिक्षण व्यवस्थापकांसाठी प्रशासन सांभाळणे कठीण झाले आहे. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो, या दिशेने आपण कुठे चाललो आहोत?

महाराष्ट्राच्या भवितव्यासाठी, तरुणांच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी, आणि समाजातील ज्ञान-संस्कारांच्या जतनासाठी ही तातडीची वेळ आहे, आता प्रत्यक्ष कृतीची गरज, नाही फक्त घोषणांची गरज.....!

------------

■ **प्रा. डॉ. प्रशांत विघे**
**सिनेट सदस्य,**
**संत गाडगे बाबा विद्यापीठ, अमरावती**
**९३२६८७७७४९**

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## गणेश वंदना!

प्रथम पुजेचा
मान तुम्हा
अगाध तुमची
त्रिभुवनी किर्ती ..

कार्यारंभी करीता
हृदयस्थ प्रार्थना
विघ्ने सारी हरती
पुर्ण होती मनोकामना ..

बुध्दीची देवता तूम्ही
देईजे मम सद् बुध्दी
कृपादृष्टीने होवो
माझी कार्य सिध्दी .

# जनतेला देण्यात येणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिशील आणि तंत्रज्ञानयुक्त असाव्यात : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

शासनाकडून जनतेला देण्यात येणा-या सेवा पारदर्शक, गतिशील आणि तंत्रज्ञानयुक्त असाव्यात. शासनाची संस्थात्मक बांधणी करताना नाविन्यपूर्ण आणि सातत्याने केलेल्या बदलांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने सज्ज असले पाहिजे. प्रशासनाने लोकाभिमुख सेवा वाढविल्या तरच शासनाचे उत्तरदायित्व वाढेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे 150 दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत ई-गव्हर्नन्स सुधारणा मोहिमेत सहभागी विभाग आणि कार्यालये यांच्या अंतरिम प्रगतीचा आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी उपस्थित होते.




मुख्यमंत्री म्हणाले की, ई-गव्हर्नन्सचे दीडशे दिवसांचे विविध विभागांचे सादरीकरण झाले ते चांगेल आहे. शासनाची संस्थात्मक बांधणी करण्यासाठी शासनाचे सर्व विभाग ई-गव्हर्नन्स सुधारणा मोहिमेत नाविन्यपूर्ण काम करत आहेत, ही चांगली बाब आहे. शासनात अनेक चांगले अधिकारी येतात आणि ते नाविन्यपूर्ण संकल्पना मांडतात पण ती संकल्पना कायमस्वरूपी टिकवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. प्रशासनात गुणवत्तापूर्ण बदल करताना शासन आणि जनता यांच्यामध्ये समन्वय साधणारी यंत्रणा तयार होणे गरजेचे आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, राज्याच्या विकासाला हातभार लावण्यासाठी प्रशासनाने ए.आय. चा वापर करून अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त विविध सेवा देण्याचा प्रयत्न करावा. यामुळे प्रशासनावरील कामाचा ताण कमी होण्यास

## ई-गव्हर्नन्स सुधारणा मोहिमेचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा

मदत होईल. महाराष्ट्र तंत्रज्ञान वापरत असून हा अग्रकम कायम राखण्यासाठी व देशात प्रथम क्रमांकावर राहण्यासाठी नाविन्यपूर्ण व सातत्याने केलेल्या बदलांची प्रभावी अंमलबजावणी करावी. 150 दिवसांच्या कार्यक्रमात अधिकाधिक काम पूर्ण करुन प्रशासनामध्ये बदल करण्यासाठी सामान्य प्रशासनाबरोबरच प्रशिक्षित मनुष्यबळ महत्त्वाचे आहे. आपल्या सर्वांना खूप काम एका वेळेला पद्धतशीरपणे करणे अत्यंत आवश्यक आहे.

वन विभागाने 33 टक्के वनआच्छादन निर्मिती करण्याचा आगामी चार वर्षांचा आराखडा या तीन महिन्यात सादर करावा.जिथे वनक्षेत्र कमी आहे अशी ठिकाणे त्याचबरोबर मराठवाड्यात वनक्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत अशाही सूचना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केल्या. यावेळी कोकण परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'समुद्र संदेश' ॲप चे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. अमानवी आणि एन्ट्री पॉईंटच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसवावेत अशा सूचना मुख्यमंत्री यांनी केल्या.

मुख्य सचिव राजेश कुमार यांनी ई-गव्हर्नन्स अंतर्गत देण्यात आलेल्या 150 दिवसांच्या कार्यक्रमामध्ये 100 टक्के कार्यालयांनी भाग घेतला असून सर्वांनीच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्कृष्ट काम केल्याबद्दल कौतुक केले. प्रत्येक विभागाने आपला स्वतंत्र डॅशबोर्ड तयार न करता राज्याचा एकच डॅशबोर्ड असेल, सर्वांनी त्यावरच आपल्या कामाची लिंक द्यावी, अशी सूचना त्यांनी केली. त्याचप्रमाणे चॅटबॉट, डिजीलॉकर, गतीशक्ती पोर्टल आदींच्या बाबतीत देखील एकसूत्रता असावी, आपले सरकार पोर्टलमध्ये अपिलची सुविधा असावी, सर्व प्रकारची प्रमाणपत्रे ऑनलाईन मिळण्याची सोय करावी, अशा सूचना केल्या.

# तरुणीची सोनसाखळी हडपून केला लैंगिक अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

तरूणीशी इन्स्टाग्रामवर ओळख निर्माण करून तिला लॉजवर नेऊन तिच्या गळ्यातील अडीच तोळ्याची सोनसाखळी पहाण्यास घेऊन ती परत देण्यासाठी तिला शरीर संबंधात भाग पाडणाऱ्या व नंतर तिचा गर्भपात घडवून आणणाऱ्या एकावर फरासखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सौरभ विलास धोत्रे (२५, रा. वडत्तरवाडी, दिपबंगला चौक) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका २१ वर्षीय तरूणीने पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. हा प्रकार मे २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मे २०२४ मध्ये फिर्यादी आणि तरूणीची इन्स्ट्राग्रामवर ओळख झाली. त्यातून त्याने तरूणीला भेटण्यास बोलवून तिला एका लॉजवर नेले. तेथे तिला तिच्या गळ्यातील अडीच तोळ्याची सोनसाखळी पहाण्यास मागीतली. त्यानंतर ती सोनसाखळी परत करण्यासाठी त्याने तिच्या इच्छेविरोधात तिच्यावर लैंगिक अत्यार केले. यानंतर तरूणी गर्भवती राहिल्यानंतर तिला गर्भपात करण्यास भाग पाडले. आरोपीने तिची सोनसाखळी परत न केल्याने त्याने तिच्यासोबत बोलणे बंद केल्याणे व भेटणे बंद केल्याने त्याने तरूणीचा बनावट इन्ट्राग्राम आयडी तयार केला. त्यावरती तरूणीचे व आरोपी सोबतचे फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच आरोपीने तरूणीच्या वडीलांच्या दुकानावर जाऊन ७० हजार रूपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास आरोपीने त्याचे आणि तरूणीचे फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली.

# लालबागचा राजाला १ कोटींवर दान



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

मुंबईचा राजा अशी ओळख असलेल्या लालबागचा राजाच्या चरणी गणेशोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांतच भाविकांनी भरभरून दान केले आहे. मंडळाकडून मिळालेल्या माहितीनुसार, बाप्पाच्या दानपेटीत अवघ्या दोन दिवसांत १ कोटी १९ लाखांहून अधिक रोख रक्कम जमा झाली आहे. यासोबतच सोन्या-चांदीचे दागिनेही मोठ्या प्रमाणात अर्पण करण्यात आले आहेत.

शुक्रवारी एकाच दिवसात ७३.१० लाख रुपयांचे विक्रमी दान जमा झाले. यामध्ये स्टेजसमोरील दानपेटीत ३८.१० लाख रुपये, तर दर्शनाच्या रांगेतील दानपेटीत ३५ लाख रुपये मिळाले. रोख रकमेव्यतिरिक्त भाविकांनी २२५.८०० ग्रॅम सोने आणि ७,६५९ ग्रॅम चांदीचे दागिनेही दान केले. यापूर्वी गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी मंडळाला ४६ लाख रुपयांचे दान मिळाले होते.

त्यात स्टेजसमोरील पेटीतून २५.५० लाख रुपये आणि रांगेतील पेटीतून २०.५० लाख रुपये जमा झाले होते. पहिल्या दिवशीही १४४.०५० ग्रॅम सोने आणि ७,१५९ ग्रॅम चांदीचे दागिने अर्पण करण्यात आले होते. या दोन दिवसांतील एकूण दानाची बेरीज पाहता बाप्पाच्या चरणी १ कोटी १९ लाख रुपयांची रोख रक्कम, सुमारे ३६९.८५० ग्रॅम सोने आणि १४,८१८ ग्रॅम चांदी जमा झाली.

# पुण्यात नोव्हेंबरमध्ये खासदार क्रीडा महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट युवा फॉर विकसित भारत अशी साद घालत 'खासदार क्रीडा महोत्सव' उपक्रमाची संकल्पना मांडली आहे. मोदीजींची 'फिट इंडिया'ची संकल्पना साकार होण्यासाठी पुण्यात पहिला 'खासदार क्रीडा महोत्सव' येत्या नोव्हेंबरमध्ये आयोजित केला जाणार आहे. त्यामुळे दीपोत्सवानंतर पुणेकरांना खेलोत्सव अनुभवता येणार आहे, अशी महिती केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक मंत्री, पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने डेक्कन जिमखाना येथे झालेल्या पत्रकार परिषदेवेळी खासदार क्रीडा महोत्सवाचे प्रमुख समन्वयक व छत्रपती पुरस्कार विजेते मनोज एरंडे, ऑलिंपिक खेळाडू व अर्जुन पुरस्कार विजेते मनोज पिंगळे, भारतीय हॉकी संघाच्या माजी कर्णधार व अर्जुन पुरस्कार विजेता रेखा भिडे, अर्जुन पुरस्कार विजेते कबड्डीपटू शांताराम जाधव, अर्जुन पुरस्कार विजेते विलास कथुरे, माजी क्रिकेटपटू केदार जाधव, कुस्तीगीर संघाचे संदीप भोंडवे, हिंदकेसरी योगेश दोडके आदी उपस्थित होते. संयोजन समितीमध्ये नेमबाज व खेलरत्न पुरस्कार विजेत्या अंजली भागवत, अर्जुन पुरस्कार विजेत्या कबड्डीपटू सुरेखा द्रविड, बुद्धिबळ ग्रँडमास्टर अभिजित कुंटे यांच्यासह पुण्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश आहे.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, देशात क्रीडा संस्कृती रुजवण्यासाठी 'फिट इंडिया' अंतर्गत खासदार क्रीडा महोत्सवाचे आयोजन होत आहे. या महोत्सवात खेळाडूंसोबतच ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग अशा सर्वांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. भारतीय खेळांसह आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळल्या जाणाऱ्या सर्व खेळांच्या स्पर्धा होतील. ३३ प्रकारच्या क्रीडा स्पर्धांमध्ये हजारो खेळाडू सहभागी होणार आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी बुद्धीबळ व कॅरम, दिव्यांगांसाठी बास्केटबॉल व पोहण्याची स्पर्धा घेण्यात येणार आहे.खासदार क्रीडा महोत्सव हा देशातील प्रतिभावान युवा खेळाडूंचा शोध घेणारा महोत्सव आहे.

# आवाजाच्या भिंतींविरोधात डॉक्टर, वकील, विद्यार्थ्यांचा मूक मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
धुळे, दि. ३० :

सण, उत्सवात आवाजाच्या भिंतींमुळे (डीजे) आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, लेसर प्रकाशामुळे होणारा दृष्टीदोष, याकडे लक्ष वेधण्यासाठी येथे इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी सकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात डॉक्टर, वकील, ज्येष्ठ नागरिक, खेळाडू, शालेय विद्यार्थी आणि व्यावसायिक यांची एकजूट दिसून आली. सर्वांनी आवाजाच्या भिंती, लेसर प्रकाशाचा वापर बंद करण्याची मागणी केली.

धुळ्यातील श्रीराम पेट्रोल पंपाजवळील छत्रपती शिवाजी स्मारकापासून मोर्चला सुरुवात झाली. मोर्चात आयएमएचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष रवी वानखेडकर, आयएमए धुळेचे अध्यक्ष मनिष जाखेटे, उपाध्यक्ष महेंद्र राजपूत, सचिव योगेश ठाकरे, खजिनदार राहुल बच्छाव, चारुहास जगताप, नारायण




गलाणी, संजय शिंदे, रवींद्र पाटकरी, विवेक जाधव, स्वप्निल पाटील, अभिनय दरवडे या डॉक्टरांसह धुळे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नितीन बंग, सेंट अँथनी स्कुलचे फादर विल्सन रॉड्रीक्स यांच्यासह शहरातील अनेक संस्था, संघटनांचे पदाधिकारी तसेच विविधि शाळांमधील विद्यार्थी, नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थीनी, वकील संघटना आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. मानवाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करणाऱ्या आवाजाच्या भिंतींना कायमस्वरुपी हद्दपार केले पाहिजे. कानात सतत काहीतरी गुणगुणत असल्याची आणि सतत काहीतरी वाजल्याची जाणीव होणे, एकाग्रतेत अडथळा येणे,वृध्दांमध्ये डोकेदुखीची समस्या उद्भवणे असे शारीरिक विकार होतात.

## ओला-उबर-रॅपिडोवर घणाघात; परवाना नसेल तर खेळ खल्लास!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

महाराष्ट्र शासनाने ई-बाईक टॅक्सी धोरण ठरवण्याची प्रक्रिया सुरू असतानाही परवाना न घेता सेवा सुरू ठेवणाऱ्या ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या कंपन्यांवर सरकारने आक्रमक पवित्रा घेतला आहे. शासनाच्या आदेशाला न जुमानणाऱ्या कंपन्यांवर सातत्याने दंडात्मक कारवाई सुरूच राहील, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला. मुंबई परिसरात बाईक टॅक्सी ॲग्रिगेटर कंपन्यांविरोधात नागरिकांच्या अनेक तक्रारी आल्यानंतर कालच मोटार परिवहन विभागाने मोठी कारवाई केली. ५७ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून १.५ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. शासनाचे आदेश वारंवार मोडणाऱ्या कंपन्यांचे परवाने कायमचे रद्द करण्याचे निर्देशही देण्यात आले.

# माविमच्या माध्यमातून ४० मेट्रिक टन हिरवी मिरची दुबईला निर्यात

■ महासागर प्रतिनिधी. मुंबई, दि. ३० :

ग्रामीण महिलांना औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पा अंतर्गत विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच बारामतीतील ३० महिला शेतकऱ्यांनी उच्च दर्जाची हिरवी मिरची पिकवून तब्बल ४० मेट्रिक टन उत्पादन दुबईला निर्यात केले असून यामुळे इतर महिलांनाही प्रोत्साहन मिळत आहे.

ग्रामीण महिलांनी कृषी क्षेत्रात नेतृत्व करत आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या मार्गदर्शनाखाली बारामतीतील ३० महिला शेतकऱ्यांनी उच्च दर्जाची हिरवी मिरची पिकवून तब्बल ४० मेट्रिक टन उत्पादन दुबईला निर्यात केले. हा उपक्रम नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात आला. या उपक्रमाची अंमलबजावणी संघर्ष क्लस्टर मायक्रो रिसोर्स सेंटर, बारामती यांच्या माध्यमातून झाली असून कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच खरेदी व बाजारपेठेसाठी आदी नेचर फूड्स प्रा. लि. यांच्याशी खरेदी हमी करार करण्यात आला.

२२ एकर क्षेत्रावर प्रायोगिक तत्वावर सुरू झालेल्या या शेतीत ठिबक सिंचन, मल्चिंग पेपर, सेंद्रिय खतांचा वापर व एकात्मिक कीड व्यवस्थापनासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यात आला. नेदरलँड तंत्रज्ञानावर आधारित उगमशिव मिरचीची रोपेही वापरण्यात आली.

एकूण उत्पादनात प्रति महिला सरासरी ६,००० किलो मिरची मिळाली. त्यात स्मिता पवार (७,६९२.५ किलो), रोहिणी जाधव (७,६६७.५ किलो) आणि राणी जामधडे (६,०५२.५ किलो) यांचे विशेष योगदान राहिले. अनियमित पाऊस, काढणी नंतरची गुणवत्ता व नियार्तीतील आव्हाने यावर मात करण्यासाठी सतत फील्ड मार्गदर्शन, पीक विमा सल्ला व प्रक्रिया प्रशिक्षण दिले गेले. पुढील टप्प्यात उत्पादनाच्या गुणवत्तेसाठी स्थळावर ग्रेडिंग युनिट उभारण्याची योजना आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढले असून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा अनुभव, तांत्रिक ज्ञान आणि उद्योजकीय कौशल्य विकसित झाले आहे.

# मराठा आरक्षणासाठी संविधानात बदल करू शकत नाही का : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

मराठा आरक्षणाच्या मागणीने पुन्हा एकदा राज्यातील राजकारण ढवळून निघाले असताना, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर थेट हल्ला चढवला आहे. मराठा आरक्षणासाठी संविधानात बदल करू शकत नाही का? केंद्रात तुमचंच सरकार असताना कायदे का नाही करत? असा थेट सवाल राऊतांनी केला आहे. तर आंदोलक पावसात भिजत असताना सरकार मात्र बघ्याची भूमिका घेत आहे,संविधानाच्या चौकटीत बसणारे निर्णय घेण्याचे सत्ताधाऱ्यांचे विधान जर खरे असेल, तर मग विरोधकांना दाबण्यासाठी संविधान बदलता येतो आणि मराठा



समाजाला आरक्षण देताना का नाही? का असा सवालही त्यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्यांशी चर्चा केली पाहिजे. त्यांनी अहंकार बाजूला ठेवत प्रमुख विरोधी पक्षासह सर्व माजी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली पाहिजे. त्यांच्यासह मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली पाहिजे. आरक्षणावर सामूहिक निर्णय घेतला पाहिजे.

संजय राऊत म्हणाले की, सरकारमध्ये ३ गट आहे. एकनाथ शिंदे आंदोलकांना वेगळ्या पद्धतीने देवेंद्र फडणवीस अडचणीत यावे यासाठी मदत करत आहे. देवेंद्र फडणवीस यांची भूमिका वेगळी आहे. ते परशुराम महामंडळ वाले आहेत. तर अजित पवार हे चीनच्या भिंतीसारखे तटस्थ आहे. आंदोलनावर त्यांची भूमिका नाही, अशा परिस्थितीमध्ये राजकीय इच्छाशक्ती येणार कुठून असा सवाल राऊतांनी केला आहे. यामुळे संविधानाची चौकट बदलणार कशी? या सगळ्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांचे प्राण पणास लागले आहे. आणि त्यांचे हजारो समर्थक आहेत ते रस्त्यावर पावसात भिजत बसले .

# दगडूशेठ गणपतीचे रुग्णालयात व्हर्च्युअल दर्शन

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

भक्ती आणि सेवेची उदात्त परंपरा कायम राखत, यंदा सलग १० व्या वर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे 'इमर्सिव्ह दर्शन' हे ज्यांना प्रत्यक्ष उत्सवात येणे शक्य नाही अशांसाठी ट्रस्टने उपलब्ध करून दिले आहे. व्हर्च्युअल रिॲलिटी द्वारे यंदाच्या सजावटीमध्ये प्रत्यक्ष आपण उभे आहोत तसेच थेट गुरुजींच्या शेजारी उभे राहून आरतीत सहभागी झाल्याचा अनुभव रुग्णांनी घेतला. रुग्णालयात असूनही बाप्पाचे दर्शन घेता आल्याने अनेकांचे डोळे पाणावले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवात अजय पारगे आणि संजय पारगे बंधू यांनी पुढाकार घेत हा अभिनव उपक्रम राबविला. मंगळवार पेठेतील कमला नेहरू रुग्णालय आणि कसबा पेठेतील सूर्या सह्याद्री रुग्णालयातील



रुग्णांनी यानिमित्ताने दर्शनाचा आनंद घेतला. आजारपणामुळे रुग्णालयातील खाटेवरुन कुठेही जाता न येणा-या रुग्णांना गणेशोत्सवात लाडक्या गणरायाचे दर्शन घेण्याची मनोमन इच्छा असते. मात्र, इच्छा असूनही त्यांना विविध आजारांशी झुंज देत रुग्णालयात राहून केवळ मनामध्ये गणरायाचे रूप साठवावे लागते. अशा रुग्णांना 'व्हर्च्युअल रिॲलिटी' द्वारे आपण प्रत्यक्षपणे उत्सवमंडपात आहोत.

# मराठा आरक्षण : उत्तर कोण देणार?

मुंबईतील आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस सुरू आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी ते ठाम आहेत. पण, या आंदोलनामागचा मोठा प्रश्न असा की उत्तर देणार कोण?

मनोज जरांगे पुन्हा का आले, हा सवाल आता राजकारणाच्या केंद्रस्थानी पोहोचला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावर सूचक प्रतिक्रिया देत स्पष्ट सांगितले की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नाची उत्तरे फक्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच देऊ शकतात. मागच्यावेळी त्यांनी नवी मुंबईत जाऊन प्रश्न सोडवला, मग जरांगे पुन्हा मुंबईत का आले, हे त्यांनाच सांगावं लागेल.

राज ठाकरेंचं हे वक्तव्य नुसतं सूचक नाही तर सत्तेच्या गाभाऱ्यातील गोंधळ उघड करतं. कारण आरक्षणाच्या मुद्यावर सरकारमधील तिन्ही गटांची भूमिका वेगळी आहे. खासदार संजय राऊत यांनीही आज बोट ठेवले, महायुतीत तीन वेगवेगळ्या भूमिका आहेत. शिंदे आंदोलकांना मदत करत आहेत, फडणवीस परशुराम महामंडळाच्या पातळीवर आपला वेगळा अजेंडा राबवत आहेत आणि अजित पवार मात्र चीनच्या भिंतीसारखे तटस्थ उभे आहेत.

या सर्व राजकीय समीकरणात खऱ्या प्रश्नाचे उत्तर मात्र समाजाला मिळत नाही. मराठा आरक्षणाच्या कायदेशीर अडचणी सर्वांनाच माहीत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने मर्यादा आखून दिलेल्या आहेत. तरीही आंदोलनं होत आहेत, उपोषणं होत आहेत, वाहतूक कोंडी होतेय, मुंबईकर त्रस्त होत आहेत. पण निर्णायक निर्णय कुठे आहे?



दीपक कैतके

शरद पवार यांनीही या वादाला वेगळा टप्पा दिला आहे. ७२ टक्के आरक्षण तामिळनाडूत शक्य आहे, तर महाराष्ट्रात का नाही? त्यासाठी घटनेत बदल करण्याची भूमिका केंद्राने घ्यावी, असं ते म्हणाले. म्हणजेच चेंडू आता केंद्र सरकारकडे फेकला गेला आहे.

प्रश्न असा आहे की, राज्य सरकारने काय भूमिका घ्यायची? एकनाथ शिंदे हेच आता या कोड्याचं उत्तर देऊ शकतील का? कारण राज ठाकरे, राऊत आणि पवार यांचं वक्तव्य एकाच दिशेने इशारा करतंय, मराठा आरक्षण हा आता सामाजिक नव्हे तर थेट राजकीय निर्णयाचा विषय झाला आहे.

जरांगे उपोषणावर ठाम आहेत, समाज रस्त्यावर आहे, पण राजकीय इच्छाशक्ती कुठे आहे? राज्य सरकारनं लवकरात लवकर ठोस भूमिका घेतली नाही, तर हे आंदोलन केवळ मुंबईच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र हादरवेल.

मराठा समाज उत्तराची वाट पाहतोय... पण उत्तर अजूनही फक्त प्रश्नच आहे.

■ ■ ■

# अवैध लेआऊटमध्ये भूखंड घेणाऱ्यांना दिलासा तर विकणारे येणार रडारवर
# गुन्हे दाखल करण्याचा पालकमंत्री बावनकुळेंचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३० :

अवैध लेआऊटमध्ये किंवा नियमानुकूल नसलेल्या लेआऊटमध्ये भूखंड खरेदी करणाऱ्या सर्वसामान्यांचे नुकसान होणार नाही, आम्ही गुंठेवारी कायद्यातील तरतुदीनुसार भूखंड घेणाऱ्याला दिलासा देऊ. परंतु अवैध लेआऊट टाकून भूखंड विक्री करणाऱ्यांवर चौकशीअंती गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा शुक्रवारी महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

जिल्हा नियोजनच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. या वेळी खा. अनिल बोंडे, आ. प्रवीण तायडे, आ. राजेश वानखडे, आ. चंदू यावलकर, आ. गजानन लवटे व अधिकारी उपस्थित होते. अमरावती शहरातील ६२ वर्षे जुना



रेल्वे उड्डाणपूल वाहतुकीसाठी अचानक बंद झाल्याने अडचण झाली.

परंतु, त्याला बंद करण्याशिवाय पर्याय नव्हता. या पुलासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी सर्व लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन चर्चा करणार आहे. यावर निर्णय होईल. नवा पूल होईपर्यंत काही पयार्यी व्यवस्था होऊ शकते का यावरही चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या तीन महिन्यात ४८ शासकीय विभागांचे प्रमुख जिल्ह्यात कार्यालयीन दौरे करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते नेमके काय काम करणार आहे, याबाबत सविस्तर माहिती प्रेझेंटेशनद्वारे आम्हाला आगामी बैठकीत ते देतील, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या आहेत.

नियोजन अधिकाऱ्याच्या चौकशीचा ठराव मंजूर तत्कालीन जिल्हा नियोजन अधिकारी अभिजित मस्के यांच्या अमरावतीमधील संपूर्ण कार्यकाळाची चौकशी करण्याचा ठराव जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजूर झाला आहे. हा ठराव नियोजन विभागाच्या प्रधान सचिवांना पाठवण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. सर्व लोकप्रतिनिधींनी मस्के यांच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त केली होती. त्यानुसारच हा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरात अजून सीसीटीव्ही नाही, मात्र नियोजन न.प.चे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आगामी काळात जिल्ह्यातील नगर पालिका स्तरावरही सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्याचे नियोजन आहे. वास्तविकता मागील अनेक वर्षांपासून दोन ते तीनवेळा प्रस्ताव तयार करूनही अमरावती शहरात अद्यापही सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले नाहीत. परंतु नगर पालिकेच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

नागरिक ३ तास ताटकळत पालकमंत्री बावनकुळे डीपीसीची सभा घेण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाल्याने अनेक नागरिक त्यांना निवेदन देण्यासाठी जिल्हाकचेरीत पोहोचले. ही बैठक बंदद्वार असल्याने शासकीय विभागप्रमुख, आमदार, खासदार यांनाच प्रवेश होता. बैठक साडेतीन वाजता संपणार असे नियोजनात होते मात्र बैठक साडेसहा वाजता संपली. त्यामुळे शेकडो नागरिक तसेच काही धावपटूंना पालकमत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र दिले जाणार होते, तेही तीन ते चार तास नियोजन भवनाच्या बाहेर ताटकळत उभे होते.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219